महाराष्ट्र सरकार
आणि अन्य
फेरर विरोधक
यांना
लाईफ नियतकालिकाचे
आव्हान !

२९ मार्च १९६९ । किंमत ४० पैसे

# माणूस

डॉक्टर कर्ट कोर्बर
यांचे
गिरणदान
— मुंबई समाचार

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : चव्वेचाळीसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस पये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. मार्च, १७

दि. १५ मार्चचा अंक वाचला. मुखपृष्ठावरील 'दोन जीवनयात्रां,' बावत आतील श्री. वसु भगत यांनी लिहिलेला लेख समयोचित व सूचक वाटला. ब्रिगेडिअर दळवी यांची अनुवादित 'झुंड' उल्लेखनीय आहे. या दोन लेखांव्यतिरिक्त इतर सर्व लिखाण कंटाळवाणे वाटते. गणपत मास्तरची सामान्य गोष्ट व ग्यानबाचे लिखाण समाधान करीत नाही.

**माधव वाघमारे**

पंचायत समिती, पैठण.

स. न. मार्च, ८

दि. ८ मार्चचा अंक वाचला. 'झुंड'चा पहिलाच हप्ता अपेक्षा वाढविणारा आहे. 'मनोगते' चिन्तनीय, 'ग्यानबा' मर्मभेदक, 'रातराणी'ची आठवण झाली. 'माणूस'मध्ये कथांना जागा नको आहे. अर्थात कथा चांगल्या असतात. परंतु इतर वाङ्मयापुढे कथा वाचण्याची ओढ उरत नाही.

**शरद कुलकर्णी**, परळी.

किमत : ४० पैसे

१०२५ सदाशिव

पुणे २

दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

सु. ल. सोमण

# गुरुजी मुंबईत !

शिवाजी पार्कवर नेहमीच मोठमोठ्या सभा भरत असतात. शिवाजीपार्कने पाहिला नाही असा एकही राष्ट्रीय पुढारी नसावा. परंतु रविवार दि. १६ मार्चला शिवाजी पार्कवर भरलेली सभा बऱ्याच अर्थांनी अगदी वेगळी होती. राष्ट्रीय स्वयं-सेवक संघाचे सरसंघचालक प. पू. गोळवलकर गुरुजींची ही सभा बरीच गाजणार अशी अटकळ बऱ्याच जणांनी बांधलेली होती. श्री. गुरुजींनी काही महिन्यांपूर्वीच मुंबईच्या 'नवाकाळ' दैनिकाला मुलाखत दिली होती, आणि मुलाखतीतल्या चातु-र्वर्ण्यविषयक विचारांवर बरीच वादळी चर्चा झाली; अद्यापही चालू आहे. गुरुजींच्या चातुर्वर्ण्यविषयक विचारांचा निषेधही प्रत्यही सर्वत्र चालू आहे. ह्या पार्श्वभूमीवर श्री. गुरुजींची सभा मुंबईत होणार होती. ह्या सभेच्या वेळी कम्युनिस्टस्, संसोपावाले, युक्रांद, शेकाप वगैरे विविध संघटनांचे कार्यकर्ते निदर्शने करणार ही बातमीही प्रसिद्ध झाली होती, तर 'हिंदु राज्य पक्षा'चे सर्व काही श्री. ल. ग. ऊर्फ कर्तारसिंह थत्ते हे प्रतिनिदर्शन करणार हेही जाहीर झाले होते. ह्याच सर्व कारणांमुळे ही सभा गाजणार, सभेच्या वेळी वातावरण तंग राहणार व कदाचित काही गडबडही उडणार असे अनेकांना वाटत होते. परंतु सुदैवाने तसे काहीच झाले नाही. सभेचे एकूण स्वरूप पाहता, निदर्शने अगदीच किरकोळ होती. गुरुजींवर गेल्या काही महिन्यांत अफाट टीका झाली असताही टीकाकारांविषयी साधा कटू उद्‌गारही गुरुजींच्या भाषणात सापडला नाही, मात्र निदर्शकांनी त्यांच्या हातात धरलेल्या फलकांवर श्री. गुरुजींची जी वेडीवाकडी चित्रे लावलेली होती, त्यांवरून निदर्शकांची मनोवृत्ती मात्र उमगली. श्री. थत्ते येणाऱ्या-जाणाऱ्यांना सांगत होते– "डांगे-अत्रे-टिळक ह्यांना हिंदुधर्माविषयी बोलण्याचा काही अधिकारच नाही." त्यांच्याकडे येणाऱ्या-जाणाऱ्यां-पैकी किती जणांनी लक्ष दिले असावे हे मात्र कुणी विचारू नये.

श्री. गोळवलकर गुरुजींनी ही सभा जिंकली असेच सभेचे एकंदर कामकाज पाहता म्हणावे लागेल. कुठलीही सभा म्हटली म्हणजे ती ठरलेल्या वेळेपेक्षा तास-दोन तास उशीरा सुरू होणार ही नेहमीची वहिवाट. परंतु आधी जाहीर केल्या-

प्रमाणे, बरोबर साडेपाचच्या ठोक्याला श्री. गुरुजी व्यासपीठावर हजर राहिले. ध्वजाला व शिवछत्रपतींच्या पुतळ्याला अभिवादन करून सभेला सुरुवात झाली. सुरुवातीची औपचारिक, कंटाळवाणी लांबण न लावता, सभा कशी सरकन मुख्य मुद्द्यावर आली. सुरुवातीला छोटी, छोटी तुटक वाक्ये आली– त्यातून संघाची कार्य-पद्धती, त्यातील शिस्तबद्धता, तत्त्वप्रणाली वगैरेंची ओळख त्यांनी करून दिली. जस-जसे ते 'हिंदुराष्ट्रवाद', 'हिंदुत्व', परकीय आक्रमणांचा धोका वगैरे मुद्द्यांवर आले, तसतशी, त्यांच्या ओघवत्या, प्रगल्भ वाणीची मोहिनी श्रोत्यांवर पडू लागली. तब्बल नव्वद मिनिटे ते अस्खलित बोलत राहिले आणि जवळजवळ पाऊण लाखाची ती अत्यंत शिस्तबद्ध सभा त्यांनी अक्षरशः खिळवून ठेवली. संघाचे स्वयंसेवक आणि पुरस्कर्तेच नाहीत, तर कित्येक विरोधकही त्यांच्या भाषणाने भारावले. मुंबई-तील वृत्तपत्रांनी दिलेल्या बातम्यांवरून नजर जरी फिरवली तरीदेखील हे सहज लक्षात येईल.

श्री. गुरुजींनी आपल्या भाषणात प्रांतीयतेचा तीव्र धिक्कार केला, तर ज्या चातु-र्वर्ण्याविषयी एवढा गहजब माजलेला आहे त्यावर त्यांनी, अगदी अपेक्षेप्रमाणेच एक शब्दही उच्चारला नाही, किंवा स्वतःवरील आक्षेपांचे खंडन करायचा प्रयत्न केला नाही. मात्र, भाषणात वेळोवेळी त्यांनी जातीय उच्चनीचतेवर कडाडून हल्ला चढवला. आपल्या भाषणात त्यांनी दोन नवीन विचार मांडले. पहिला म्हणजे हिंदू सामाजाचे संघटन. हे करीत असताना त्यांनी सर्व मुस्लिम, ख्रिश्चन, (की जे मूळचे हिंदूच होते) बांधवांना स्वधर्मात परत यायचे आवाहन केले, आणि ह्या धर्मात परत आल्यानंतरही त्यांना त्यांच्या सध्याच्या पद्धतीने ईशस्तवन, रूढी पाळण्याचे स्वातंत्र्य आहे, असे मत व्यक्त केले. त्यांच्याकडून गुरुजींची अपेक्षा एवढीच की, त्यांनी आपली ईश्वर-धर्मविषयक मते न बदलताही हिंदुसमाजाशी एकरूप होऊन जावे व भारताला आपली मातृ-भू, पितृ-भू मानून त्याच्या प्रतिष्ठेपायी झटावे. ह्या वेळी कै. स्वा. सावरकरांच्या 'हिंदुत्वा'ची आठवण होणे साहजिकच आहे. परंतु वाईट एवढेच वाटते, की हा ज्वलंत राष्ट्रवादी विचार नुसताच बोलून दाखवला जातो. त्या विचाराला प्रत्यक्षात आणण्यासाठी नुसत्या आवाहनांचा उपयोग होणार नाही, तर काही भरीव कार्यक्रम हाती घेतला गेला पाहिजे; पण नेमके तेच होत नाही. सभे-नंतर कुणी वार्ताहर आपसांतल्या चर्चेत म्हणाला, "अन्य धर्मियांत ही भावना वाढीस लावण्यासाठी श्री. गुरुजी मुस्लिम, ख्रिश्चनांस शाखेत यायला परवानगी का देत नाहीत ? तसे घडले तर कदाचित् ते हिंदू समाजाशी अधिक लवकर एकरूप होऊ शकणार नाहीत का !

"पाकिस्तानातल्या अगदी अलीकडच्या उत्पातातून पूर्व बंगालमध्ये साम्यवाद्यांचा जोर वाढला आहे. चीनकडे त्यांचा कल आहेच. भारतातल्या पश्चिम बंगालमध्येही मध्यावधी निवडणुकीत साम्यवाद्यांची सरशी झाली आहे व त्यांची चीनशी असलेली

दोस्ती जाहीर आहे. दोन्ही बंगालचे एकीकरण घडवून आणून बंगालचे स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र उभे करायचे स्वप्न उराशी बाळगून असलेला एक घटक आज प्रभावीपणे वावरत आहे. चीन व पाकिस्तान ह्यांच्या संमिश्र हालचालींतून, पूर्व पाकिस्तानातून भारतावर चीनचे दुसरे आक्रमण ह्यामुळे व्हायची शक्यता आहे."

श्री. गुरुजींनी आपल्या भाषणात व्यक्तविलेला हा दुसरा महत्त्वाचा विचार. भारताच्या सीमांच्या सुरक्षिततेविषयी गंभीर इशारा देणारा हा विचार. १९६२ च्या चिनी आक्रमणापूर्वी कै. सावरकर, कै. शामाप्रसाद मुखर्जी, डॉ. लोहिया आदी नेत्यांनी अशाच तऱ्हेचे परखड इशारे सरकारला दिले होते. त्यांची वाट काय लागली ते सर्वश्रुतच आहे. श्री. गुरुजींनीही प्रत्यक्ष परिस्थितीचे अवलोकन करून, आपले मत बनवले आहे आणि सरकारला इशारा दिला आहे त्याचा तरी उपयोग होईल का!

श्री. गुरुजींनी इतरही बरेच विषय हाताळले. 'सेनां'वर हल्ले चढवले. ज्वलंत राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. मंगला-धरणाच्या उद्घाटन समारंभप्रसंगी प्रेसिडेंट आयूबना श्रीमती गांधींनी पाठवलेल्या शुभ संदेशाचा त्यांनी अत्यंत कडवट शब्दांत धिक्कार केला. परंतु देशातल्या सर्व थरांत राष्ट्रभावना चेतवली जावी व प्रत्येक भारतीय समान तत्त्वांवर ओळखला जावा असे म्हणताना, त्यासाठी संघ कुठली भरीव पावले टाकणार हे त्यांनी स्पष्ट केले नाही. ज्या आर्थिक-सामाजिक कारणांनी गेली हजारो शतके इथला हिंदू समाज विभिन्न गटांत विभागला गेला आहे, त्यावर उपायकारक अशी प्रत्यक्ष कृती, संघ काही करणार की नाही हेही त्यांनी स्पष्ट केले नाही. लांब लांब बौद्धिके, शिवाजी-राणाप्रतापांच्या आदर्श जीवनांचे निव्वळ पठण, अनुशासनबद्ध हिंदू-समाजाच्या व ज्वलंत राष्ट्रवादांच्या घोषणा, हिंदू चालीरीतींचा अभिमान वगैरे साधनांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बहुजन-समाजाशी एकरूप होऊ शकत नाही हे संघाचा इतिहासच स्पष्ट करील. शहरातल्या सुशिक्षित समाजात राष्ट्रवाद पसरविण्याची आज फारशी गरजच नाही– त्याचे बरेचसे मुख्य प्रश्न आर्थिक आहेत. ते सोडवण्यासाठी, आकर्षक कार्यक्रम संघाने हाती घेतला तर, त्याच्या शिस्तबद्ध संघटनेतून संघ तो सहजच पार पाडू शकेल आणि मगच, संघाच्या राष्ट्रवादी विचारसरणीची छाप जनतेवर पाडू शकेल. शहरांपेक्षाही भारतात बहुसंख्य असलेला ग्रामीण विभाग अद्यापही दारिद्र्य, अज्ञान, दुष्ट चालिरीती, रूढी, आर्थिक-सामाजिक गुलामगिरी ह्यांत पिचून निघत आहे. त्यांच्या समस्यांचा खल करण्यासाठी आजही स्वातंत्र्यानंतर वीस वर्षांनीही, फादर फेरर, रे. स्कॉट वगैरेंना संधी मिळत आहे. मिशनऱ्यांजवळ असणारा अफाट पैसा संघ उभारू शकणार नाही हे मनाला पटत नाही. मिशनऱ्यांनी त्यांनी केलेल्या धर्मांतरांचा निषेध करूनही खेड्यापाड्यांतून आदिवासी विभागातून केलेले बहुजन समाजाच्या उत्कर्षाचे कार्य खासच प्रशंसनीय ठरावे आणि मिशनऱ्यांची जागा घ्यायला जोपर्यंत संघ पुढे येत नाही तोपर्यंत हिंदू-समाज संघटनेच्या, ज्वलंत राष्ट्र-

वादाच्या घोषणा व्यर्थ होत. संघाने हे केले तर मात्र तो मिशनऱ्यांपेक्षाही भव्य यश मिळवू शकेल.

## ' लाईफ ' आणि फादर फेरर

स्पॅनिश मिशनरी फादर फेरर ह्यांनी मनमाड येथे चालवलेल्या कार्याची छाननी करून, महाराष्ट्र सरकारने त्यांच्यावर गहर्य कृत्ये केल्याचा आरोप ठेवला व त्यांना मनमाड सोडून जायला भाग पाडले. भारत सरकारच्या मेहेरनजरेने आणि ह्या देशातल्या ख्रिश्चनांनी आणि स्वतंत्र पक्षीयांनी केलेल्या प्रयत्नांना यश येऊन त्यांना भारतात पुन्हा प्रवेश मिळाला. केंद्राच्या आशीर्वादाने आणि श्री. ब्रह्मानंद रेड्डींच्या कृपेने त्यांनी आपल्या कामाला आंध्र प्रदेशातल्या अनंतपूर येथे सुरुवात केली आहे.

चार महिन्यांपूर्वी बदनाम होऊन परतलेल्या ह्या फादरच्या मनमाडच्या परिसरातल्या कार्याला ' लाईफ ' ह्या अमेरिकन नियतकालिकाने अकरा पानी प्रसिद्धी देऊन फादर फेरर ह्यांचे ' भारताचे महान प्रसिद्धिपराङ्मुख संत ' असे वर्णन केले आहे. विविध चित्रे वगैरे देऊन सजवलेल्या ह्या लेखात ' लाईफ ' पुढे म्हणते की, " मनमाडच्या परिसरातल्या सहस्रावधी महाराष्ट्रीयनांना त्यांच्या भयानक दारिद्र्यातून मुक्त केले, त्यांना सहकारी-शेतीचा आणि कामाच्या महतीचा कानमंत्र देऊन त्यांचे जीवन फादर फेररनी फुलवले...धर्म किंवा येशू ख्रिस्त ह्यांविषयी ते क्वचितच बोलतात...त्यांना महात्मा गांधींइतकेच थोर मानून ' बाबा फेरर ' संबोधणारे शेकडो सहस्त्रो जीव आजही आहेत...त्या परिसरात त्यांनी शाळा, दवाखाने बांधले, हजारो विहिरी खणल्या, पंधराशे विद्यार्थ्यांची खाण्यापिण्याची सोय केली, आठशेहून अधिक अनाथ बालकांना आश्रय दिला...सुरुवातीला त्यांना परंपराप्रिय महाराष्ट्रीयन समाजाचा खूप विरोध झाला पण अविश्रांत धडपड, त्यांच्या अडचणींच्या वेळी मदतीचा हात, अस्खलित मराठीतून त्यांनी तिथल्या लोकांशी केलेली चर्चा, वगैरेंतून त्यांनी तो विरोध निपटून काढला...शेतकरी सेवक मंडळाची स्थापना केली. त्याद्वारे विहिरी खणल्या, शेते फुलवली. त्यांतल्या उत्पन्नावर आणखी विहिरी खणल्या, शेते पिकवली...लॉरेल-हार्डींची नाटके—सिनेमे ह्यांचे मुंबईत प्रयोग करून निधी जमवला...फादर फेररना खुद्द त्यांच्या मिशनतर्फे विरोध झाला; कारण त्यांनी कुठल्याही हिंदू शेतकऱ्याचे धर्मांतर केले नाही; मदत मात्र दिली...त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे राजकीय पुढाऱ्यांचा रोष त्यांनी ओढवून घेतला...पण ते भारतीय जीवनाशी तादात्म्य पावले होते. महाराष्ट्र सरकारने त्यांना निघून जायला सांगितले तरी त्यांनी सर्व मानापमान गिळून भारतातच इथल्या दलित समाजाची सेवा करण्यासाठी परतायचे ठरवले... आज

त्यांची चळवळ सातशे खेड्यांतून पसरली आहे... महाराष्ट्र सरकारने त्यांना निघून जायला सांगितले तेव्हा 'दोन हजारांहून अधिक शेतकरी, मनमाड-मुंबई १८० मैलांचे अंतर, त्या निर्णयाच्या निषेधात चालून गेले... आज ते भारतात परतत आहेत. भारतीयांना त्यांना परतताना पाहून आनंदच होत आहे. जगभर त्यांना कशी लोकप्रियता मिळत आहे त्याचेच हे प्रतीक नाही का ? "

'लाईफ' हे जगभर अफाट वाचकवर्ग असलेले अमेरिकन नियतकालिक आहे हे लक्षात घेता वरील अकरा पानी लेखाने फादर फेररना केवढी अमाप प्रसिद्धी दिली आहे ते लक्षात घेतले पाहिजे. ते इथे असताना त्यांच्यावर जे अनेक आरोप करण्यात आले होते, त्याच्या अगदी विरुद्ध प्रसिद्धी त्यांना 'लाईफ'ने दिली आहे; किंबहुना महाराष्ट्र सरकार, इथले अन्य फेरर-विरोधक ह्यांना 'लाईफ'ने आव्हानच दिले आहे. ह्याचा गंभीर विचार झाला पाहिजे. राष्ट्रवाद्यांनी हे आव्हान स्वीकारले पाहिजे.

---

## आता पाळी रशियाची !

---

१९५० ते १९६२ पर्यंत तिबेट, ब्रह्मदेश, भारत इत्यादींबरोबर सीमा-संघर्ष पेटवून आता माओ राजवटीने आपली नजर रशियन सरहद्दीकडे वळवली आहे. ज्या पद्धतीने त्यांनी जुन्या राजवटींनी ब्रिटिशांबरोबर केलेले तिबेटविषयी सरहद्दीचे मॅक्मोहन रेषेचे करार फेटाळून लावून मांच्यू राजवटीच्या उत्कर्षाच्या काळातल्या सीमा रेषाच ग्राह्य धरायचा आग्रह धरला व हे प्रदेश घशाखाली घातले, त्याच पद्धतीने त्यांनी रशियाबरोबरच नवा वाद उकरून काढला आहे. १८५८ आणि १८६० चे सीमा-करार त्यांना मान्य नाहीत; कारण त्या वेळच्या प्रबळ झार राजवटीने अत्यंत दुर्बल झालेल्या मांच्यू राज्यकर्त्यांवर ते करार बळाने लादले होते. चिन्यांनी आता जवळजवळ ६ लक्ष चौरस मैलांच्या रशियन भूप्रदेशावर दावा सांगितला आहे. अर्थात साध्या रोजच्यारोज चकमकींच्या वार्ता येत असल्या तरी चीन रशियाबरोबरच्या सर्वंकष युद्धात उडी घेणार नाही असे वाटते. कारण रशियन सामर्थ्याचा योग्य अंदाज चीनला आहेच.

चीनने आज रशियाबरोबर उकरून काढलेले भांडण केवळ सरहद्दीचे नाही हे उघड आहे. हे भांडण साम्यवादी जगातल्या नेतृत्वाचे आहे, सरहद्दीचे निमित्त आहे. कदाचित्, येत्या जागतिक कम्युनिस्ट कॉंग्रेसवर डोळा ठेवून रशियाने ह्या पडलेल्या ठिणगीला प्रज्वलित करायचे धोरण ठेवले असावे; काही का असेना, आज ही दोन प्रबळ साम्यवादी राष्ट्रे, उसूरी नदीच्या परिसरात, सायबेरियन-मांच्युरियन सरहद्दीवर एकमेकांसमोर दंड थोपटून उभी ठाकली आहेत. ह्यात

कुणाची बाजू भारताने घ्यावी हा प्रश्नच उभा राहत नाही. ही दोन्ही साम्राज्यवादी राष्ट्रे आहेत. आपली साम्राज्ये विस्तारण्याची तहान त्यांना लागली आहे. आणि म्हणूनच, ह्या दोन राष्ट्रांतला संघर्ष, ह्या दोन राष्ट्रांच्या पंजात धडपडणाऱ्या तिबेट, झेकोस्लावाकिया, रुमानिया वगैरे राष्ट्रांना स्वातंत्र्याची संजीवनी देणारा ठरावा. भारताला ही संधी ठरावी, व ह्या संधीचा फायदा घेऊन, त्यांच्याच अनुभवाचे माप त्यांच्या पदरात टाकून चिनी हेतूंचा, चिनी–पाकिस्तानी फळीचा रशियनांना आलेख द्यायचे काम भारताने बजावावे आणि रशियन मैत्री दृढ करण्याच्या मार्गावर राहावे– निदान पाकला होणाऱ्या रशियन शस्त्रास्त्र मदतीला पायबंद घालायचा तरी प्रयत्न व्हावा! रशियन संरक्षणमंत्री श्री. ग्रेचको ह्यांची भारत–भेट ह्याच दृष्टीने महत्त्वाची होती.

## काय हा विरोधाभास?

आपल्याकडे गिरणी-कामगारांना वा अन्य कोणत्याही कामगारांना आपली न्याय्य वेतनश्रेणी मिळवून घेताना, चार टक्के बोनस मिळवताना मालकवर्गाशी अक्षरशः भांडावे लागते, झगडावे लागते. ह्यासाठी संप, मोर्चे, निदर्शने, सत्याग्रह ही मुंबईतली, किंबहुना भारतातली रोजची दृश्ये! परंतु ह्याचवेळी, भागधारकांना मात्र वाढत्या प्रमाणात डिव्हिडंड नियमितपणे दर वर्षी दिला जातो. ह्या पार्श्वभूमीवर पश्चिम जर्मनीतून आलेली एक बातमी वाचली आणि वाटले तिथल्या मालक वर्गाच्या आणि इथल्या कारखानदारांच्या मनोवृत्तीत केवढा हा विरोधाभास! हॅम्बुर्ग येथील एक कारखानदार डॉ. कर्ट कोर्बर ह्यांनी आपला साडेपाच कोटी रुपयांचा कारखाना, कारखान्यांतल्या दोन हजार कामगारांच्या स्वाधीन केला आहे. कारखान्याच्या भांडवलाचे प्रतिष्ठानात रूपांतर करून कंपनीच्या दोन हजार कामगारांना त्यांनी मालक बनविले आहे. डॉ. कोर्बर हे स्वतः आता ह्याच कंपनीत कामगार म्हणून काम करणार आहेत. डॉ. कोर्बर ह्यांचा हा कारखाना, सिगारेट्स बनवणाऱ्या स्वयंचलित मशीन्सच्या निर्मितीचा, जगातला सर्वांत मोठा कारखाना आहे. ह्या कारखान्यातून उत्पादित झालेल्या मशीन्सद्वारे, जगातल्या एकूण उत्पादनाच्या एकदशांश सिगारेट्स बनवल्या जातात. फ्रान्सचा संपूर्ण सिगारेट धंदा ह्या कंपनीवर अवलंबून आहे, तर अमेरिकेतल्या दर दोन सिगारेट्समागे एक सिगारेट ह्या कंपनीत तयार झालेल्या मशीनवर बनवली जाते!

अभिनंदन डॉक्टर कर्ट कोर्बर! आणि भारतीय कारखानदारांनो, हा आदर्श लक्षात घ्या, कामगारांना अधिक सहानुभूतीपूर्ण वागणूक द्या. तुमच्या उद्योगधंद्यांना ग्रासणारा कम्युनिझम समूळ उखडला जाईल! ○

## मु क्ता फ ळे

## भोयांची पालखी

"आम्ही पाश्चिमात्यांकडून निवडणुकीची जी पद्धत उचलली, त्यामुळे आज देशात जातिभेद इतका तीव्रपणे पसरला आहे की, जितका पूर्वी कधीही नव्हता. ज्या भेदांवर राजा राममोहन रॉयपासून महात्मा गांधींपर्यंत सर्वांनी प्रहार केले व जो मोडकळीस आला होता तो आज इतका का वाढत आहे ? या निवडणुकींनी जातिभेदांना प्रोत्साहन दिले आहे. चांगलीच माणसे निवडून येतील याचा भरंवसा उरलेला नाही, " असे विनोबा म्हणतात. विनोबांच्या अनेक चमत्कारिक मतांपैकी हे एक असल्याने इकडे फारसे लक्ष देण्याचे कारण नाही; परंतु निवडणुकींतून जातिभेद नष्ट करण्याचा अगदी सोपा मार्ग नुकताच पुण्यात काही मंडळींना सापडलेला आहे. हा मार्ग सर्वांनी अवलंबिल्यास जातिभेद निवडणुकीतून हद्दपार होईल याबद्दल आम्हांस शंका नाही.

त्याचे असे झाले. पुण्यातील कसबा पेठेतील एका नगरपित्याने आत्महत्या केली. निवडून आलेल्या माणसांच्या निधनाने ताबडतोब काही होत असेल तर एक जागा रिकामी होते ! आत्महत्या केलेले हे उमेदवार भोई जातीतले होते. आपल्या जातीला मिळालेली ही जागा आपल्याच जातीत राहावी अशी सर्वांची इच्छा असणे स्वाभाविक होय. यासाठी सर्व भोई मंडळींनी सभा घेतली. त्यात चार भोई जातीतले उमेदवार नगरसेवा करण्याच्या ईर्षेने पुढे झाले. मग सर्व जातवाल्यांनी मतदान केले; त्यांत श्री. गोविंदराव रामभाऊ तारू यांना ७०० मते पडून ते 'जातीत' निवडून आले. या भोई मंडळींनी लगेच जाहीर केले की, जर काँग्रेसने गोविंदरावांना आपला उमेदवार म्हणून पत्करले तर ठीकच आहे, नाही पत्करले तर कसब्यातील

सर्व भोई मंडळी ही श्री. गोविंदराव तारू यांनाच ते 'भोई' जातीचे असल्याने मत देणार आहेत.

निवडणुकीतून जातीय प्रचार काढणे भारतात शक्य आहे, असे आम्हांस वाटत नाही. परंतु देवळापर्यंत चपला घालून, आत शिरण्यापूर्वीच फक्त आपण त्या जशा बाहेर ठेवतो, त्याप्रमाणे ज्या वॉर्डात जी जात बहुसंख्य असेल त्यांनी आपल्या जातीची सभा घेऊन आपला 'इच्छुक' असा निवडला तर प्रत्यक्ष निवडणुकीत जातीयता नाही, असे आपण नक्की म्हणू शकू! श्री. तारू यांची ही अभिनव पद्धत या देशाला तारल्याशिवाय राहणार नाही. यापुढील विधानसभेच्या व लोकसभेच्या निवडणुका अशा 'तारू' पद्धतीने झाल्या तर विनोबांची टीकाही बंद झाल्याशिवाय राहणार नाही.

श्री. गोविंदराव तारू हे भोयांच्या पालखीतून पुणे नगरपालिकेत प्रत्यक्ष गेल्यास निवडणुकीच्या इतिहासात त्यांचे नाव सुवर्णाक्षरांनीच लिहावे लागेल, याबद्दल आम्हांला शंका नाही. या 'तारू' पद्धतीचे स्वागत असो.

---

## ताश्कंद लंगोटी !

---

विसाव्या शतकात 'राष्ट्र' या एकाच निकषावर जगात लढाया होत राहतील, असे भाकित नित्शे या जर्मन तत्ववेत्त्याने केलेले होते. आज माओ जो चीन उभारीत आहे, तो एक 'राष्ट्र' म्हणून. मार्क्स आणि लेनिन यांची नावे तोंडात घोळवीत तो फक्त आपल्या देशाच्या पुसटलेल्या सीमा पुनः प्रस्थापित करीत सुटला आहे. यामुळे नंबुद्रिपाद, डांगे आदी थोर थोर तत्त्ववेत्त्यांची पंचाईत होते आहे, याची त्या कोणाला कल्पना दिसत नाही. एक साम्यवादी राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर कधीही आक्रमण करीत नाही, असे छातीठोकपणे सांगणारे लाल चोचींचे भारतीय पोपट सध्या अवाक् झाले आहेत. याचे कारण दुष्ट माओ. रशिया-चीनची सरहद्द ३८०० मैल भिडलेली आहे. माओने भारतावर हल्ला चढवला तेव्हा "भारत आमचा मित्र असला तरी चीन आमचा भाऊ आहे," म्हणून माओला पाठीशी घालणाऱ्या रशियन अस्वलाच्या पोटात माओने आता गुदगुल्या सुरू केल्या आहेत. रशियाच्या झारने, चीनमधील मांच्चू राजाकडून बळकावलेली भूमी माओ आता परत मागतो आहे. काय म्हणावे या उद्दामपणाला! माओ म्हणतो-"हे जुने करारमदार आम्हांला मंजूर नाहीत. अमूर आणि उसूरी नद्यांच्या आसपासचा भूभाग आमचा आहे तो देऊन टाका. या अमूर नदीत नौकानयनाचे अधिकार तुम्हांला काय तुमच्या बापाने दिले ?" माओच्या या मागण्या रशियन ठगांनी मानायच्या ठरवल्या तर चीनची सरहद्द रशियाच्या पोटात काही ठिकाणी ३०० मैल आत घुसणार आहे.

माओ इतकेच करून थांबत नाही. त्याने रशियाला बजावले आहे-"तुमची

लोकसंख्या फक्त वीस कोटी असताना एवढा प्रचंड प्रदेश तुम्ही का बळकावून बसला आहात ? शंभर वर्षांपूर्वीच तर तुम्ही मैकल सरोवराच्या पूर्वेकडचा प्रदेश आपल्या राज्याला जोडून घेतलात, तेव्हापासूनच व्हॅलॅडीव्होस्टॉक हे रशियन शहर झाले काय ? जपानची कुरील बेटे तुम्ही कोणत्या न्यायाने दावून ठेवली आहेत ? तुम्ही आतापर्यंत विस्तार पावत होता; कारण, आम्ही जागे नव्हतो. मेहेरबान, आता आमचा हिशेब देण्याइतके आम्ही समर्थ झालो आहोत !"

रशियन प्रदेशात हजारो चिनी नागरीक घुसवायला माओने सुरुवात करताच गेली दोन वर्षे चीन–रशिया सरहद्दीवर सारख्या चकमकी झडू लागल्या. गेले कित्येक दिवस या गोष्टी दाबून ठेवण्यात आल्या होत्या. परंतु माओने आता या रशियन भूमीवर चीनची अधिसत्ता प्रस्थापित करण्यासाठी अगदी शास्त्रशुद्ध मोहीमच उघडलेली दिसते. सरहद्दीचे नवे नकाशे सर्वत्र प्रसृत करण्यात आले आहेत व चीन–रशिया सरहद्द सध्या धुमसू लागलेली आहे.

हे भावाभावांतले युद्ध आहे. तेव्हा या सबंधांत मित्राने काही बोलू नये, हेच योग्य असले तरी रशियाने भारताचा आदर्श पुढे ठेवला तर या संकटातूनच कोसिजीन वाचतील, असे आम्हांस वाटते. रशियन सेनानींनी चिन्यांना अशी धमकी दिली आहे की, सरहद्दीवर झुंडीने आत घुसणारे चिनी नागरीक परत घेतले नाहीत तर नाइलाजाने गोळ्या चालवाव्या लागतील. हा आततायीपणा बरा नव्हे. आसाममध्ये गेली कित्येक वर्षे पाकिस्तानी मुसलमान सरहद्दीवरून आत घुसत आहेत. आसामच्या मुख्य मंत्र्यांनी किती टाहो फोडला, परंतु भारताच्या संरक्षण मंत्र्यांनी कधी गोळ्या चालवल्या का ? अखेर पूर ओसरलाच की नाही ? दिनांक ५ मार्चला लोकसभेत यशवंतराव चव्हाणांनी सांगितले–" पूर्व पाकमधून आसाममध्ये घुसणाऱ्या पाकिस्तानीयांच्या संख्येत आता चांगलीच घट झाली आहे !"

तेव्हा कोसिजीनसाहेब, चिन्यांना गोळ्या वगैरे घालू नका बुवा. त्यांना घरेदारे द्या. नोकऱ्या द्या. मताधिकार द्या. युद्धाने काय प्रश्न सुटतात ? युद्धाने सरहद्दी फुटतात, आणि कधी कधी धोतरे सुटतात. कोसिजीनसाहेब, ताश्कंद स्पिरिट दाखवा. या लंगोटीने लज्जा–रक्षण होत नाही ? नाहीतर लोक म्हणतील या लंगोट्या फक्त इतरांच्या लज्जा–रक्षणासाठीच तुम्ही पुरवता. अहिंसा, सत्य, शांततामय सहजीवन, इत्यादी सूत्रे ही राजकारणात तुम्ही फक्त एक्स्पोर्ट करू नका बुवा ! !

— — ग्यानबा

# नियमितपणें वापरल्यानें फोर्हान्स टूथपेस्ट हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालते

तरुण तसेंच वयस्कर लोकांकडून आलेली अनाहूत प्रशस्तीपत्रें हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालण्यात फोर्हान्स टूथपेस्टला मिळालेल्या आश्चर्यजनक यशाची स्तुति करतात. ही प्रशस्ती पत्रें जेफ्री मॅनर्स ॲन्ड कं. लि. च्या कोणत्याहि कार्यालयात पहावयास मिळतील.

"मला दांतांच्या विकाराचा त्रास होत असे. मी आपली **फोर्हान्स** वापरू लागलो. आता मला दांतांचा कोणताच विकार नाहीं. सुमारे २० ते २५ लोक आधीची टूथपेस्ट **बदलून** फोर्हान्स वापरू लागले आहेत. आणि माझ्या कुटुंबात **तर ती सर्वात अत्यंत** आवडती होऊन राहिली आहे."

—उदयशंकर तिवारी, पाटणा.

"शास्त्रीय पद्धतीने बनविलेली आपली **फोर्हान्स टूथपेस्ट** गेली दहा वर्षें मी वापरीत असून तिच्यामुळे माझे **हिरड्यांचे** सर्व विकार दूर झाले. आता माझ्या कुटुंबातील सर्वजण **फोर्हान्स टूथपेस्टने** नियमितपणे दांत घासतात."

—एस. एम. लाल, नवी दिल्ली.

**दांतांची योग्य निगा राखण्यासाठीं फोर्हान्स टूथपेस्ट व फोर्हान्स दुहेरी कार्य करणारा टूथब्रश दर रात्रीं व सकाळीं वापरा...आणि आपल्या दंतवैद्याकडे नियमितपणें जात चला!**




**मोफत! "दांतांची व हिरड्यांची निगा" नामक रंगीत पुस्तिका**

ही पुस्तिका आपल्याला मराठी, हिंदी अथवा इंग्रजीमधून मिळूं शकेल. त्याकरितां हे कूपन भरून (टपालखर्चासाठीं) १५ पैशांच्या स्टॅम्पसहित पुढील पत्त्यावर त्वरित पाठवा : मॅनर्स डेन्टल ॲडव्हायझरी ब्यूरो, पोस्ट बॅग क्रमांक १००३१, मुंबई १.

नांव ______________________ वय ________

पत्ता ______________________________

भाषा ______________________

## फोर्हान्स दंतवैद्याने निर्मिलेली टूथपेस्ट

65F. 182MR

वसु भगत

# एक सर्जनशील व्यक्तिमत्त्व

चित्रपटाला कलेचे स्वरूप प्राप्त करून देणाऱ्यांत रशियन कलावंत आयसेन्स्टीन याचा वाटा फार मोठा आहे. आयसेन्स्टीनच्या आधी चित्रपटांची निर्मिती अगदीच प्राथमिक अवस्थेत होती. या नवीन माध्यमाचे स्वरूप, मर्यादा आणि सामर्थ्य शोधण्याचे प्रयत्न अपवादानेच होत होते. आयसेन्स्टीन हा, या माध्यमाच्या मूलभूत तत्त्वांचा शास्त्रशुद्ध व्यासंग करणारा पहिला अभ्यासक होय. आपल्या व्यासंगातून त्याने चित्रपटाच्या कलास्वरूपाविषयीची गूढ तत्त्वे स्पष्ट केली. चित्रणात आणि संकलनात त्याने प्रयोग केले. चित्रपटाचे माध्यम हे कलामाध्यम असून जीवनानुभव व्यक्त करण्यासाठी ते किती समर्थ आहे, हे त्याने स्पष्ट करून दाखविले. अनुभव अभिव्यक्त करताना साहित्य, नृत्य, नाट्य, चित्रकला या कलाप्रकारांना ज्या मर्यादा पडतात, त्या मर्यादा चित्रपटाला नाहीत; किंबहुना हा नवीन कलाप्रकार ते अनुभव अधिक अचूकपणे आणि प्रभावीपणे व्यक्त करू शकतो, ही जाणीव सर्वांत प्रथम आयसेन्स्टीननेच करून दिली.

सर्ज मिखाइलोविच आयसेन्स्टीन याचा जन्म १८९८ साली रिगा येथे एका धनाढ्य कुटुंबात झाला. चित्रकलेविषयी त्याला लहानपणापासूनच आवड होती. ' पेत्रोग्राद इन्स्टिटयूट ऑफ सिव्हिल इंजिनीअरिंग 'मध्ये त्याने चित्रकलेचे अध्ययन केले. अध्ययनाच्या काळात त्याच्यावर लिओनार्दो द व्हिन्सी या सुप्रसिद्ध चित्रकाराच्या जीवनाचा व कर्तृत्वाचा फार मोठा प्रभाव पडला. या चित्रकाराचे जीवन व कलाकृतींचा त्याने मन:पूर्वक अभ्यास केला. फ्रायडने लिओनार्दो द व्हिन्सीच्या जीवनाचे व कलेचे जे मानसशास्त्रीय संशोधन केलेले होते त्याच्या अभ्यासातून आयसेन्स्टीनला



# आयसेन्स्टीन

मानसशास्त्र या विषयात रुची निर्माण झाली. १९१८ साली तो स्वतःहून लाल सैन्यात भरती झाला. दोन वर्षांनंतर म्हणजे १९२० साली त्याने आपल्या सहकारी सैनिकांच्या मनोरंजनासाठी एक नाटयसंस्था स्थापन केली. त्याच वर्षी तो सैन्यातून मुक्त झाला. त्यानंतर त्याने मॉस्कोला जाऊन 'प्रोलेट्कल्ट वर्कर्स थिएटर'मध्ये व्हलेरी प्लेतेनोव या लेखकाच्या हाताखाली दिग्दर्शक व कलादिग्दर्शक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. या नाटयसंस्थेचा निर्माता मेअरखोल्द हा अत्यंत धाडसी आणि उत्साही होता. रंगभूमीवर वेगवेगळे प्रयोग तो हौसेने करीत असे. नाटयगृहात प्रोजेक्टर बसवून, नाटकाचाच एक भाग म्हणून, नाटकांतून चित्रपट दाखविण्याचा प्रयोग त्यानेच प्रथम केला. आयसेन्स्टीनचा चित्रपटाशी प्रत्यक्ष संबंध आला तो इथेच!

'प्रोलेट्कल्ट वर्कर्स थिएटर'च्या नाटयनिर्मितीचा आयसेन्स्टीनच्या समग्र कलाजीवनावर अत्यंत गहिरा परिणाम झाला, असे मानले जाते. ही नाटयसंस्था रशियन क्रांतीतील चैतन्यपूर्ण घटना अतिशय भव्य स्वरूपात रंगभूमीवर सादर करीत असे. याच सुमारास एक जपानी नाटयसंस्था 'काबुकी'चे प्रयोग करण्यासाठी मॉस्कोला आली होती. जपानच्या या 'काबुकी रंगभूमी'नेही आयसेन्स्टीनवर सखोल परिणाम केल्याचे त्याच्या चित्रपटांवरून प्रत्ययास येते. 'काबुकी रंगभूमी'वरील अभिनयाला परंपरेने एक विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले आहे. भावदर्शन आणि शारीरिक हालचालींना प्रतीकात्मकता आली आहे. भारतीय नृत्यांतील मुद्रांसारखेच या अभिनयाचे स्वरूप असते. आणि या 'मुद्रां'तूनच काबुकी नाटकातील 'ॲक्शन'

बांधली जाते. विविध संज्ञांच्या बांधणीतून जसा जपानी शब्द निर्माण होतो तसेच कावुकी नाटकातील अभिनयाचेही होते. 'कान आणि दार यांच्या एकत्र निर्देशातून ऐकण्याची क्रिया व्यक्त होते. चाकू आणि हृदय यांच्या एकत्रीकरणातून दुःखभाव व्यक्त होतो. या अभिनयपद्धतीचा आयसेन्स्टीनच्या निर्मितीवर फार मोठा प्रभाव पडला आहे. विभिन्न शॉट्स्च्या बांधणीतून मॉटॉज निर्माण करण्याची कल्पना या 'कावुकी रंगभूमी 'च्या प्रभावातूनच जन्माला आली असणे शक्य आहे.

१९२४ साली आयसेन्स्टीनने 'प्रोलेट्कल्ट थिएटर'मधील सहकाऱ्यांच्या साहाय्याने 'स्ट्राईक' हा चित्रपट निर्माण केला. क्रांतिपूर्व काळातील कामगारांची अवस्था दाखविणाऱ्या चित्रपटांची एक मालिका निर्माण करण्याची आयसेन्स्टीनची योजना होती. आणि 'स्ट्राईक' हा त्या मालिकेतील पहिला चित्रपट होता. केवळ एक शैक्षणिक चित्रपट निर्माण करण्याचा आयसेन्स्टीचा हेतू असला तरी त्याच्यातील कलावंताने या हेतूच्या मर्यादा झुगारून दिल्या आणि 'स्ट्राईक' हा एक कलात्मक स्वरूपाचा प्रायोगिक चित्रपट झाला. या चित्रपटाला १९२५ साली पॅरिसच्या चित्रपट महोत्सवात पारितोषिक मिळाले. १९२५ साली त्याने 'द बॅटलशिप पोटेम्किन' हा चित्रपट निर्माण केला. १९०५ च्या क्रांतीचे दर्शन घडवावे, असा या चित्रपटाच्या निर्मितिमागचा हेतू होता, पण ओडेसातील उठावाच्या नाटयपूर्ण प्रसंगानेच त्याचे मन इतके व्यापून टाकले की, इतर सर्व चित्रीकरण रद्द करून त्याने केवळ या एका प्रसंगावरूनच आपले सारे सर्जनसामर्थ्य केंद्रित केलें आणि तो एकच प्रसंग १९०५ च्या क्रांतीचा प्रातिनिधिक प्रसंग म्हणून उभा केला.

'स्ट्राईक' हा चित्रपट निघण्याच्या आधी सर्वसाधारणपणे संपूर्ण दृश्य एकदम चित्रित करण्याची प्रथा होती. त्या दृश्याचे लहान लहान शॉटस्मध्ये विभाजन करून, संकलनाच्या प्रक्रियेत त्या शॉटस्च्या बांधणीतून नाटय निर्माण करता येते, हे कुणी फारसे लक्षात घेतले नव्हते. अपवाद फक्त डिज्गा व्हर्तोव याचा. ही गोष्ट फक्त डिज्गा व्हर्तोवला जाणवली होती हे त्याच्या 'द मॅन विथ द मूव्ही कॅमेरा' या वस्तुपटात त्याने करून पाहिलेल्या प्रयोगावरून लक्षात येते. या प्रयोगातील सूत्राचाच अवलंब करून आयसेन्स्टीनने त्याला चित्रपटाच्या बांधणीच्या मूलतत्त्वाचे स्वरूप प्राप्त करून दिले. 'काबुकी 'त जशी मुद्रेमुद्रेने नाटयवस्तू बांधत नेली जाते, त्याचप्रमाणे आयसेन्स्टीनने 'स्ट्राईक' या चित्रपटात शॉटस्मधून कथावस्तूची बांधणी केली आहे. उज्जवायू व प्राणवायू या दोन भिन्न गोष्टी आहेत. पण त्यांच्या मिश्रणातून पाणी हा सर्वथा भिन्न अशा गुणधर्मांनी युक्त असा पदार्थ निर्माण होतो. त्याचप्रमाणे दोन भिन्न शॉटस्च्या एकत्रीकरणातून भिन्न अर्थ व्यक्त करणारे दृश्य तयार होते, हा सिद्धांत आयसेन्स्टीनने मांडला. असे करताना त्याने प्रत्येक शॉटच्या आशयाचा अभ्यास केला. मानवी चक्षू तो आशय ज्या आकारात आणि ज्या गतीने पाहू शकेल त्या आकाराच्या आणि गतीच्या आधारावर त्याने त्या

शॉटची लांबी निश्चित केली. त्या शॉटच्या अगोदरच्या व नंतर येणाऱ्या शॉटस्‌चा पृथक परिणाम आणि सर्वांच्या एकत्रीकरणानंतर होणारा संकलित परिणाम यांचा विचार केला. यातूनच त्याचा मॉंटॉजचा सिद्धांत जन्माला आला. केवळ दोन शॉट्स एकत्रित आणणे म्हणजे मॉंटॉज नव्हे. शॉटच्या एकत्रीकरणाची ही सरळधोपट परंपरागत पद्धत त्याला मान्य नव्हती. एका शॉटमधील 'ॲक्शन' ही दुसऱ्या शॉटमधील 'ॲक्शन'शी सरळसरळ जोडली गेली तर त्यातील सांधा प्रेक्षकांच्या नजरेत भरणार नाही व त्यामुळे संकलित परिणाम साधणार नाही, असे त्याला वाटत होते.

आपला हा नवीन सिद्धांत सिद्ध करण्यासाठी त्याने स्वतःचा असा 'फिल्म-टाईम' निर्माण केला. या 'फिल्म-टाईम'चे श्रेष्ठ आणि अचूक उदाहरण म्हणून त्याच्या 'द बॅटलशिप पोटोम्किन' चित्रपटातील 'द स्टेप्स ऑफ ओडेसा' या दृश्याचा निर्देश करता येईल. प्रत्यक्षात ती घटना घडण्यासाठी जो वेळ लागला असेल त्याच्या दुप्पट वेळ पडद्यावरील घटना घडण्यासाठी त्याने लावला आहे आणि काळाचा असा विस्तार करताना त्याने, संकलित परिणाम साधण्याच्या हेतूने, साऱ्या अनावश्यक तपशिलाला अजिबात फाटा दिला आहे.

या चित्रपटात आयसेन्स्टीनने प्रचार आणि कलात्मक आविष्कार यांचा अत्यंत मनोज्ञ आणि मार्मिक असा समन्वय साधला आहे. केवळ प्रचार करण्यासाठी त्याने वास्तवात घडलेल्या काही घटना चित्रपटात समाविष्ट केल्या नाहीत असा त्याच्यावर आरोप करण्यात येतो. तो खराही आहे. पण, त्यामुळे, चित्रपटाच्या माध्यमावर त्याची विलक्षण पकड आहे, या वस्तुसत्याला कोणत्याही प्रकारे बाध येतो असे वाटत नाही.

व्हर्तावने 'द मॅन विथ द मूव्ही कॅमेरा' या वस्तुपटात कंटिन्यूइटीविषयक केलेल्या प्रयोगाचे परिणत स्वरूप 'द बॅटलशिप पोटोम्किन'मध्ये आढळून येते. डिज्गा व्हर्तावने कॅमेऱ्याचे भिंग मध्यवर्ती मानून कंटिन्यूइटी साधली होती तर, आयसेन्स्टीनने प्रेक्षकाला मध्यवर्ती केंद्र मानून त्यावर आपली कंटिन्यूइटी आधारलेली आहे. तळमजल्यावरील घराच्या खिडकीत बसून लगतच्या रस्त्यावरील जीवनसंघर्ष पाहावा, असे त्याच्या कंटिन्यूइटीचे स्वरूप आहे. त्यामुळे, या चित्रपटात अंतर (Space) आणि काळ यांची प्रभावी बंदिस्त त्याला साधता आली. अंगभूत कलात्मक तटस्थतेमुळे घटनांची अत्यंत चोखंदळपणे निवड करणे शक्य झाले. शॉटस्‌मधील आशयवस्तूची रचना, भिन्नभिन्न शॉट्‌सची आशयघन बांधणी आणि समर्पक प्रतिके यांवरून आयसेन्स्टीनचे चित्रपट माध्यमावर किती प्रभुत्व होते याचा प्रत्यय येतो.

'द बॅटलशिप पोटोम्किन'नंतर आयसेन्स्टीनने 'द जनरल लाईन' हा चित्रपट निर्माण केला. एकत्रित [Collective] शेतीच्या रशियन धोरणावर हा

चित्रपट आधारित होता. तथापि, तो पूर्ण होण्याच्या आधीच ऑक्टोबर क्रांतीचा दहावा वाढदिवस आल्यामुळे 'द जनरल लाईन'चे काम बाजूला ठेवून आयसेन्स्टीनने ऑक्टोबर क्रांतीचा इतिहास सांगणाऱ्या 'ऑक्टोबर' या चित्रपटाच्या निर्मितीचे काम हाती घेतले. 'ऑक्टोबर' संपल्यानंतर त्याने 'द जनरल लाईन'-मध्ये अनेक मूलभूत फेरफार करून 'ओल्ड अँड न्यू' या नावाने तो चित्रपट निर्माण केला.

'ऑक्टोबर' हा चित्रपट तयार करण्यासाठी आपल्याला फार कमी म्हणजे फक्त तीन महिनेच वेळ मिळाला, अशी आयसेन्स्टीनची तक्रार आहे. आणि म्हणूनच कदाचित या चित्रपटाचा उत्तरार्ध हा पूर्वार्धापेक्षा कमी कलात्मक व कमी सरस झाला असावा, असा टीकाकारांचा अंदाज आहे. या चित्रपटाच्या जर्मन आवृत्तीवर जॉन रीडने जे परीक्षण लिहिले त्या परीक्षणाला त्याने "जग हादरवून सोडणारे दहा दिवस" असे सुंदर आणि अन्वर्थक शीर्षक दिले होते. कारण, या चित्रपटात क्रांतीच्या अखेरच्या दहा महत्त्वाच्या व निर्णयात्मक दिवसांतील घटनांचा सविस्तर आलेखच चित्रित करण्यात आला आहे. तथापि, हा आलेख चित्रित करताना आयसेन्स्टीनने घटनांच्या तपशिलावर अधिक भर दिल्यामुळे चित्रपटाला एखाद्या वस्तुपटाचे स्वरूप आले आहे. या चित्रपटात वापरलेली दृश्यांची आघाती रचनापद्धती चित्रपटांच्या इतिहासात अभूतपूर्व अशी आहे. या रचनेमुळे चित्रपटाचा विकास आणि कंटिन्यूइटी अत्यंत गुंतागुंतीची झाली आहे. 'द बॅटलशिप पोटेम्किन' मध्ये आयसेन्स्टीनने घटनांची सरळ मांडणी करण्याची जी पद्धत अवलंबिली होती, त्याहून 'ऑक्टोबर'मधील घटना-मांडणीची पद्धत सर्वथा भिन्न आहे. 'ऑक्टोबर'मध्ये त्याने कल्पनांचे आत्मनिष्ठ नाटचीकरण (सब्जेक्टिव्ह ड्रामॅटायझेशन) केले आहे. आणि यानंतर निर्माण केलेल्या तीनही चित्रपटांत त्याने हीच पद्धत अधिकाधिक सफाईदारपणे व अधिकाधिक यशस्वी रीतीने वापरली आहे. आपल्या या चित्रपटाचा आयसेन्स्टीन 'इंटलेक्चुअल सिनेमा' असा उल्लेख करतो. 'ऑक्टोबर' मध्ये त्याने प्रतिकांचा वापर अत्यंत प्रभावीपणे केला आहे. झारच्या साम्राज्यशाहीचा पराभव त्याने, काही कामगार दुसऱ्या निकोलसचा पुतळा उलथून पाडतात, या प्रतिकात्मक दृश्यातून व्यक्त केला असून नंतर क्रांती-विरुद्ध होणारी प्रतिक्रिया दाखवताना याच दृश्यातील काही निवडक शॉटस् उलट गतीने वापरले आहेत. प्रॉव्हिन्शियल गव्हर्नमेंटच्या आदर्शावर उपरोधिक टीका करताना त्याने एखाद्या राजकीय व्यंगचित्रकाराप्रमाणे 'फॉर गॉड अँड कंट्री' या घोषवाक्याचे विश्लेषण केले आहे. अर्थात या सगळ्या प्रतिकांचे स्वरूप हे निखळ बौद्धिक असल्यामुळे सर्वसामान्य प्रेक्षकांना हा चित्रपट समजणे अत्यंत अवघड जाते. दृश्यांची जाणीवपूर्वक केलेली रचना आणि लय ही या चित्रपटाची उल्लेखनीय विशेषता आहे.

'ओल्ड अँड न्यू' या चित्रपटात विषयाच्या मानवीकरणासाठी आयसेन्स्टीनला आयुष्यात प्रथमच काल्पनिक पात्रांशी व्यवहार करावा लागला. या चित्रपटाचा विषय मुळातच अत्यंत कठीण होता. त्यात प्रत्यक्ष कृती अशी काही घडतच नव्हती. केवळ शेतीचे यांत्रिकीकरण व एकत्रित शेती यांचे फायदे एवढेच त्याला मांडावयाचे होते; आणि म्हणूनच त्याला या चित्रपटात गूढतेचा (अॅब्स्ट्रॅक्ट) आणि प्रतिकात्मकतेचा अधिक वापर करावा लागला आहे. हा त्याचा एक यशस्वी असा चित्रपट मानला जातो. यात विनोद, कारुण्य, उपरोध आणि रशियन राजवटीवरील हृदयस्पर्शी श्रद्धा या भावनांचा मनोज्ञ समन्वय साधला गेला आहे. व्यक्तिचित्रणावर भर देणारे आणि त्यात यश संपादन करणारे जे काही अपवादात्मक मूकपट आहेत, त्यांत या चित्रपटाचा समावेश केला जातो.

हा चित्रपट तयार केल्यानंतर आयसेन्स्टीन लंडन, अमेरिका आणि मेक्सिकोच्या दौऱ्यावर गेला. या दौऱ्यात त्याने लंडन येथे चित्रपटावर व्याख्याने दिली. इतर देशांतील चित्रपट तंत्राचा अभ्यास केला. तीन वर्षे तो सतत रशियाच्या बाहेर होता. या काळात त्याने चित्रपट माध्यमांचा व्यासंग केला. चिंतन आणि लेखन केले. चित्रपटाचे शास्त्र त्याने निर्माण केले. चित्रपट या विषयावर त्याने जे लेखन केले ते अत्यंत मौलिक, महत्त्वपूर्ण आणि तितकेच अजोड आहे. त्याचे लेखन 'फिल्म फॉर्म अँड फिल्म सेन्स' या ग्रंथात एकत्रित केले असून उरलेल्या सर्व लेखनाचा दुसरा एक ग्रंथ प्रकाशित होत आहे. चित्रपटाच्या अभ्यासकांसाठी आयसेन्स्टीनचे लेखन गीतेसारखे आहे. त्याच्या अध्ययनावाचून चित्रपटाचे अध्ययन करणे शक्यच नाही.

परदेशाच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वीच आयसेन्स्टीनला ध्वनीचे चित्रपट निर्मितीतील सृजनात्मक महत्त्व जाणवले होते. तद्विषयक शक्यतांचाही त्याने या दौऱ्यात अभ्यास केला.

मायदेशी परतल्यानंतर त्याने १९३७ साली बेहिन लेविस (Bezhin Lewis) हा चित्रपट तयार केला. पण, तो अपयशी ठरला. या चित्रपटाविषयी लिहिताना डोवझेन्को या दिग्दर्शक-टीकाकाराने असे म्हटले आहे की, "फॉर्मलिझम ऑल्वेज क्रॉप्स अप व्हेन द ऑथर लॅक्स नॉलेज ऑफ द लाईफ विच् ही इज पोर्ट्रेइंग."

१९३८ साली आयसेन्स्टीनने "अलेक्झांडर नेवास्की" हा बोलपट निर्माण केला. आतापर्यंतच्या चित्रपटांत त्याने 'एपिक स्टाईल' म्हणून ओळखली जाणारी स्वतःची अशी जी पद्धती निर्माण केली होती त्या पद्धतीचे विकसित स्वरूप या बोलपटात प्रत्ययास येते. त्याच्या इतर चित्रपटांप्रमाणेच हा बोलपटही एका महान राष्ट्रीय चळवळीचे सम्यग्दर्शन घडविणारा आहे. एका ध्येयाने प्रेरित होऊन एका ध्वजाखाली एकत्र झालेल्या जनतेचे त्याने यात दर्शन घडविले आहे. तेराव्या शतकात होऊन गेलेल्या अलेक्झांडर या लोकनेत्याची व्यक्तिरेखा ही यातील मध्य-



एडिटिंग टेबलावर

वर्ती व्यक्तिरेखा आहे. एखादी पुराणकथा सांगावी तशा निष्ठेने ही कथा त्यान चित्रित केली असून त्यातील सर्व प्रमुख व्यक्तिरेखा अतिशय रेखीव आणि मानसशास्त्रीय तत्त्वांना धरून आहेत. संवाद, सेटिंग्ज आणि संगीत यांत विलक्षण वास्तवता आहे. या सर्व अंगांचा वापर अत्यंत काळजीपूर्वक व जेथे अपरिहार्य असेल तेथेच केला गेला आहे. ' रेड अँड ब्लॅक विथ ब्लड ' असे ज्या युद्धाचे वर्णन केले जाते त्या प्रसिद्ध युद्धाच्या करुण व दुर्दैवी बाजूवर भर न देता आयसेन्स्टीनने त्यातून अत्यंत स्फूर्तिप्रद आणि आशावादी वातावरण निर्माण केले आहे, ही गोष्ट त्याच्या कलात्मक सामर्थ्याचीच द्योतक आहे. या चित्रपटातील युद्धाचे दृश्य विलक्षण आशावादी परिणाम साधते. प्रतीके आणि दृश्यांतील (Visuals) आशयघनता यांचा समर्पक उपयोग येथे आढळतो. सूर्यप्रकाश, चकाकणारा बर्फ आणि सैनिकांच्या आवळलेल्या आवेशपूर्ण मुद्रा यांच्या शॉटस्च्या बांधणीतून एका विजिगीषू आत्मश्रद्धेचा (व्हिक्टोरियस सेल्फ-अॅश्युअरन्स) प्रत्यय तो घडवितो ' अलेक्झांडर नेव्हास्की ' हा चित्रपट राष्ट्रभक्तीवरील महाकाव्य म्हणून उल्लेखिला जातो.

पण, आयसेन्स्टीनच्या कलेचे परिणत स्वरूप प्रत्ययास येते ते ' आयव्हान द टेरिबल ' या चित्रपटात. १९४४ साली निर्माण केला गेलेला हा चित्रपट सोळाव्या शतकातील चौथ्या आयव्हानच्या कारकीर्दीवर आधारलेला आहे. रशियातील

तत्कालीन सामंतांवर विजय मिळवून एकसंध रशियन साम्राज्य निर्माण करण्यासाठी या चौथ्या आयव्हानने जो लढा दिला त्याचे यात चित्रण केले गेले आहे. आयसेन्स्टीनच्या इतर चित्रपटांप्रमाणेच मध्यवर्ती व्यक्तिरेखेच्या मानसशास्त्रीय अभ्यासावरच या बोलपटाची उभारणी झाली आहे. ही चित्रपटीय शोकांतिका निर्माण करताना आयसेन्स्टीनचे सारे कलासामर्थ्य पणाला लागले आहे. माणसाच्या बौद्धिक आणि भावनात्मक अनुभवांचा गुंतवळा, चित्रपटाच्या सर्व अंगांच्या संतुलित समन्वयातून किती प्रभावी रीतीने व्यक्त करता येतो याचे ' आयव्हान द टेरिबल ' हे अत्युत्तम उदाहरण होय. या चित्रपटाचे संवाद स्वत: आयसेन्स्टीनने लिहिले असून त्याने संवाद आणि संगीत यांच्या परस्पर संतुलनासोबतच, त्यांचा चित्रपटाच्या तालाबरोबरच (ऱ्हिदम) आंतरिक सुसंवादही साधलेला आहे. पटकथा लिहिताना आयव्हानच्या व्यक्तिरेखेचा विकास गतिमान आणि अखंड राहावा याची आयसेन्स्टीनने विशेष काळजी घेतली आहे. प्रतीकांचा समर्थ व समर्पक वापर आणि प्रभावी मॉंटॉज यांतून समग्र चित्रपट विकास पावत जातो. आयव्हानच्या मनातील भय आणि संशय दाखविण्यासाठी आयसेन्स्टीनने आयव्हानच्याच सावलीचा कलात्मक वापर केला आहे. त्या सावलीला आयव्हानच्या तुलनेत एवढे प्राधान्य दिले गेले आहे की, तिने आयव्हानचे व्यक्तिमत्त्व ग्रासून टाकले असल्याचा अनुभव येतो. व्ही. व्हिश्नेव्ह्स्की या रशियन नाटककाराने " ... a brilliant new affirmation of the genre of heroic tragedy " असे या चित्रपटाबद्दल म्हटले आहे तर, " The greatest historical film ever made " अशा शब्दांत चर्ली चॅप्लिनने या चित्रपटाचा उल्लेख केला आहे. आणि १९६१ साली लंडनच्या कलाकोविदांनी जगातील सर्वोत्कृष्ट अशा दहा चित्रपटांत ' आयव्हान द टेरिबल 'चा समावेश केला आहे.

चित्रपटात वापरलेली प्रत्येक गोष्ट, प्रत्येक हालचाल ही कथेच्या विकासाला पूरक असणे हे आयसेन्स्टीनच्या दिग्दर्शनाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्याच्या प्रत्येक व्यक्तिरेखेची क्रिया आणि प्रतिक्रिया, अभिनय आणि हालचाल ही जशी अपरिहार्य म्हणून होते तशीच कॅमेऱ्याची हालचालही अपरिहार्य म्हणूनच त्याने वापरली आहे. जेथे दृश्याची गतिमानता त्याला व्यक्त करायची होती तेथे तेथे त्याने कॅमेऱ्याची जास्तीत जास्त हालचाल केली आहे. अशा प्रसंगांत शॉटस्ची लांबी कमिजास्त ठेवून दृश्याच्या केंद्रवर्ती आशयबिंदूवर नेमका खटका निर्माण केला आहे. प्रसंग गतिमान करण्यासाठी कॅमेऱ्याचे कोन तो सतत बदलीत असल्याचे प्रत्ययास येते. याच्या उलट, जेथे दृश्याचा विकास त्याला संथ दाखवायचा असतो तेथे शॉटस्ची लांबी, कॅमेऱ्याची कमीत कमी हालचाल आणि कोनातील संथ बदल यांचा तो आधार घेत असतो. ' द बॅटलशिप पोटोम्किन 'मधील ' मेन अँड वॉर्म्स ' हा पहिलाच प्रसंग किंवा विभाग या पद्धतीच्या चित्रणाचे उदाहरण आहे. सर्वच प्रसंग

अत्यंत संथ चित्रित केला असून एक अधिकारी आणि इतर खलाशी यांच्यांतील भावनात्मक विरोध प्रस्थापित करण्यासाठी त्यात मोठमोठे ' क्लोजअप्स् ' आणि ' डायरेक्ट कटस् 'चा जास्तीत जास्त वापर केला आहे. खलाशांची मानसिक अस्वस्थता दाखविण्यासाठी पार्श्वभूमीवर आंदोलित होणाऱ्या समुद्राच्या लाटांचा प्रतीकात्मक उपयोग केला आहे तर, याच चित्रपटातील ' ड्रामा ऑन द आयस्ले ऑफ तेन्द्रा ' या विभागात प्रत्येक शॉटची बाह्य गती आणि अंतर्गत हालचालींच्या गतीत वेग आणून विलक्षण गतिमान नाट्य निर्माण केले आहे. ' अलेक्झांडर नेव्हास्की ' आणि ' आयव्हान द टेरिबल ' यांतही त्याने हीच पद्धत अधिक सफाई-दारपणे वापरली आहे. या चित्रपटांमध्ये कॅमेऱ्यातील हालचाल ही कथेच्या विकासाशी जास्तीत जास्त एकरूप करण्याचा त्याने प्रयत्न केला आहे.

त्याच्या चित्रपटात सेटिंग्ज आणि प्रकाशयोजनाही अशीच पूर्वनियोजित आणि कथेच्या विकासाला पूरक असते. प्रकाशयोजना ही प्रसंगाचा ' मूड ' स्पष्ट करते; तर सेटिंग्ज रूप धारण करतात. ' द बॅटलशिप पोटेम्किन 'मधील जहाजावरील चॅप्लीन हा अधःपतित धर्माचे प्रतीक म्हणून वापरला आहे. ' आयव्हान द टेरिबल '-मध्ये राजप्रसादाची भव्य आणि उदास पार्श्वभूमी आयव्हानच्या भयव्याकुल आणि संशयी मनोवृत्तीला पूरक ठरते; तर प्रासादाबाहेरचे प्रकाशमान आणि विस्तृत वातावरण जनतेच्या विश्वासाचे प्रतीक म्हणून पुढे येते. ' अलेक्झांडर नेव्हास्की ' तील युद्धाच्या वेळची चकाकणारी बर्फमय पार्श्वभूमी विजिगीषु आत्मश्रद्धेच्या प्रतीकाचे रूप घेते. आयसेन्स्टीनची प्रकाशयोजनाही अशीच महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडते. त्याच्या प्रकाशयोजनेत सामान्यतः छायांच्या वेगवेगळ्या छटांच्या प्रत्यक्ष विरोधातून आवश्यक ' मूड ' पकडण्याचा प्रयत्न केलेला आढळून येतो. ' द बॅटलशिप पोटेम्किन ' हा चित्रपट बहुतांश सूर्यप्रकाशातच चित्रित केलेला असून त्यातील छायाप्रकाशांचा विरोध अगदी ठसठशीत आहे. ' ऑक्टोबर 'मधील लेनिनच्या आगमनप्रसंगी, लेनिनची प्रतीक्षा करणारी जनता श्वास रोखून स्थिर उभी होती. त्या जनतेची अचलता, उत्सुकता व मानसिक अस्वस्थता आयसेन्स्टीनने फक्त सर्चलाईटच्या किरणांच्या आंदोलनातून व्यक्त केली आहे. हे दृश्य मुद्दाम रात्रीच चित्रित केल्यामुळे गडद अंधार व सर्चलाईटचे किरण यांतील विरोध अत्यंत गडद झाला आहे. ' ओल्ड अँड न्यू 'मधील ' क्रीमसेपरेटर ' या दृश्यात प्रारंभी म्लान व मंद प्रकाशयोजना वापरली असून, यंत्राकडून अपेक्षापूर्ती झाल्यानंतर होणारा आनंद व्यक्त करण्यासाठी प्रकाश एकदम दीप्त करण्यात आला आहे आणि त्याच्या विरोधात यंत्राच्या भोवती छायांच्या मंद छटा वापरण्यात आल्या आहेत.

आयसेन्स्टीनच्या चित्रपटांची आणखी दोन महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय अशी वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या चित्रपटांचे नायक हे, नायकाविषयीच्या सर्वसामान्य कल्पनेहून अगदी भिन्न आहेत. त्याच्या सर्व चित्रपटांचे नायक म्हणजे जनता. " The

mass was the hero." दुसरे वैशिष्टच म्हणजे त्याच्या सर्व मूकपटांत प्रमुख व्यक्तिरेखा एका स्त्रीचीच आहे. त्याच्या पहिल्या तीनही मूकपटांत 'स्त्री'च क्रांतीचे नेतृत्व करताना त्याने दाखविले आहे.

आयसेन्स्टीन हा अत्यंत बुद्धिमंत असला तरी तो मूलतः प्रतिगामी होता. वैचारिक दृष्टचा त्याने समाजसत्तावादाचा स्वीकार केला असला तरी समाजवाद त्याच्या रक्तात नव्हता. म्हणून समकालीन जीवनाच्या दर्शनापेक्षा ऐतिहासिक जीवनाचे दर्शन तो अधिक प्रभावीपणे घडवू शकला, अशी त्याच्यावर टीका करण्यात येते. पण, कलात्मकतेच्या संदर्भात हा विचार मुळीच प्रस्तुत नाही. त्याची उदंड जीवननिष्ठा आणि समाजजीवनाच्या आविष्कारात त्याने दाखविलेली वस्तुनिष्ठा याच गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. कलाकृतीतील वास्तववाद ही अभिव्यक्तीची पद्धती नसून प्रवृत्ती आहे, हे लक्षात घेतले की, त्याच्यावरील या टीकेतील निरर्थकपणा स्पष्ट होतो. सामाजिक वस्तुसत्याचा कलात्मक आविष्कार घडविताना त्याच्या सृजनशील व्यक्तिमत्त्वाने, हाती असलेल्या कलामाध्यमाचे सामर्थ्य पूर्णपणे जाणले होते. आणि त्याचा त्याने जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. अभिव्यक्तीसाठी स्वीकारलेल्या कलामाध्यमावर त्याची घट्ट पकड होती. आशयविषयक डोळस जाणीव आणि तंत्रविषयक समंजसपणा यांचा कलापूर्ण समन्वय त्याने आपल्या चित्रपटात साधला. म्हणून तर त्याच्या चित्रपटांचा 'महाकाव्य' म्हणून गौरव करावा लागला. किंवा त्याच्या चित्रपटाविषयी लिहिताना, "They are comparable only to music...They are among the few significant films of all time." असे लिहिणे थोरॉल्ड डिकन्सनला भाग पडले. ○


# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

बेचाळीस रुपये

राजहंस प्रकाशन

चंद्रशेखर मराठे

# पंतनगर कृषिविद्यापीठाचे कार्य

पंतनगरच्या कृषिविद्यापीठाचे व्हाईस चॅन्सेलर श्री. डी. पी. सिंग यांना या वर्षाच्या प्रजासत्ताक दिनी पद्मश्री हा किताब देण्यात आला हे सर्वश्रुत आहे. पंतनगर कृषिविद्यापीठाचे कार्य तसेच वैशिष्टयपूर्ण आहे. आठ वर्षांपूर्वी या कृषिविद्यापीठाची स्थापना झाली. देशातील हे पहिले कृषिविद्यापीठ होय. हे विद्यापीठ केवळ कालानुक्रमे पहिले न राहता गुणवत्तेतही पहिलेच राहावे यासाठी श्री. सिंग व त्यांचे सहकारी यांनी कार्य केले.

दिल्ली-नैनिताल हमरस्त्यावर हे विद्यापीठ आहे. १३ हजार एकर जमिनीत विद्यापीठाने आपला संसार थाटलेला आहे. संशोधन, अध्यापन व प्रात्यक्षिक अशा तीन आघाड्यांवर येथे कार्य चालते. विद्यापीठाचे मुख्य आवार वर्तुळाकार असून अर्ध्या भागात महाविद्यालये, वसतिगृहे आहेत, तर अर्ध्या भागात ५०० एकरांचे प्रायोगिक केंद्र आहे. विद्यापीठाची चार महाविद्यालये असून शेतकी, पशुवैद्यक, इंजिनीयरिंग व भौतिक शास्त्रे या शास्त्रांत ती अनुक्रमे काम करतात. पुढील वर्षी गृहशास्त्राचे महाविद्यालय मुलींसाठी उघडण्यात येईल.

हे कृषिविद्यापीठ आर्थिक दृष्टया विलक्षण यशस्वी झाले आहे. १९६५–६६ साली विद्यापीठाचे शेतीवरील उत्पन्न केवळ ८ लाख रु. होते ते १९६८–६९ साली १ कोटी रु. झाले आहे. जागतिक बँकेचे अध्यक्ष श्री. मॅकनामारा, डॉ. एन्. ई. बोरलाफ् वगैरे नामवंतांनी विद्यापीठास भेट देऊन समाधान व्यक्त केले आहे. विद्यापीठाच्या तराई, बियाणे प्रकल्पासाठी जागतिक बँक २० कोटी रु. चे साहाय्य करणार असून या प्रकल्पाने देशाची ¼ बियाणेविषयक गरज भागेल.

शैक्षणिक क्षेत्रात पंतनगरचे कार्य विशेष नजरेत भरण्यासारखे आहे. देशभर विद्यार्थी-उद्रेक धुमाकूळ घालीत असताना पंतनगर मात्र शांतपणे आपल्या अंगिकृत कार्यात मग्न आहे. या विद्यापीठातील बहुतेक विद्यार्थ्यांना या ना त्या स्वरूपांत आर्थिक मदत मिळते. मात्र या साहाय्यासाठी विद्यार्थ्यांना श्रमरूपाने हातभार लावावा लागतो. विद्यार्थ्यांना करता येण्यासारखी अनेक अर्धवेळची कामे येथे आहेत. प्रत्यक्ष काम करीत शिकल्याने या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना देशभर चांगली मागणी आहे.

नेहमीच्या अर्धवेळ कामाखेरीज शेवटच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांस प्रत्यक्ष शेती-उत्पादन करून दाखवावे लागते. सुमारे आठ विद्यार्थ्यांच्या एका तुकडीस पाच एकरांचे क्षेत्र कसण्यासाठी देण्यात येते. संपूर्ण एक शेतकी वर्षभर त्यांनी या क्षेत्रात

प्रत्यक्ष उत्पादन करावे अशी अपेक्षा असते. चांगले पीक आले तर चांगले मार्क तर मिळतातच, शिवाय चांगले उत्पन्नही मिळते. प्रत्यक्ष पीक उत्पादन योजनेतून दर विद्यार्थ्यास शेवटच्या वर्षी ५०० ते १००० रुपये वरकमाई होते. विद्यार्थी कल्याण केंद्रासाठी एक पूर्णवेळ अधिकारी असून विद्यार्थ्यांना चांगले काम मिळवण्यासाठी मदत करण्याचे काम तो करतो.

संशोधन क्षेत्रात पंतनगरने काही विक्रम केले आहेत. तराई व अन्य भागातील भाताचे पीक नष्ट करणारा रहस्यमय रोग 'खैरा' शेतकऱ्यांचे फार नुकसान करीत असे. पंतनगरने हे रहस्य उलगडले. या रोगावरील पंतनगरच्या उपाययोजनेस 'एफ्. ए. ओ' या आंतरराष्ट्रीय कृषिसंस्थेचे पारितोषिक मिळाले आहे.

सोयाबीनच्या सुधारलेल्या जाती—उदाहरणार्थ क्लार्क - ६३, हारडी, सेम्स आणि ब्रॅग — निश्चित करण्याचे कार्य विद्यापीठाने केले आहे. आज बालकांच्या खाद्यांत वापरण्यासाठी परदेशातून सोयानीत आयात करावे लागते. ही उणीव दूर करण्यासाठी विद्यापीठाने सोयाबीन लागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे व देशाची सोयाबीनची गरज पूर्णपणे भागावी, अशी विद्यापीठाची उमेद आहे.

उसाला पर्यायी पीक म्हणून पंतनगरने बीटची जोपासना केली असून त्यामुळे शेतीच्या अर्थकारणांत क्रांती होईल. याचे कारण असे की उसापेक्षा बीटच्या पिकास कमी काळ लागतो केवळ साडेपाच महिने. या उलट बीटपासून पडणारा साखरेचा उत्पादन—उतारा जास्त असतो. उसापासूनचा उतारा साडेनऊ टक्के तर बीटपासूनचा उतारा १५ टक्क्यांच्यावर ! उसाखाली वर्षभर अडणारी जमीन साडेपाच महिन्यांत मोकळी होऊ शकली तर शेतकऱ्याला एक खरीप पीक जादा घेता येईल. शेतकऱ्याला आता एका वर्षात एका हेक्टरमध्ये ७५ क्विंटल साखर व ५० क्विंटल मका वा अन्य खरीप धान्य अशी पिके घेता येऊन दर एकरी शेती व आर्थिक उत्पादन वाढविता येईल.

कृत्रिम गर्भधारणेचे कार्य आजवर तितक्या जोमाने देशात होऊ शकले नव्हते; याचे कारण म्हणजे येथील हवामानाचा जनावराच्या वीर्याच्या प्रभावावर अनिष्ट परिणाम होत असे. यावर तोड काढण्यासाठी पंतनगरने नारळाच्या दुधावर आधारित असे तंत्र शोधून काढले असून त्यायोगे पशुसंवर्धन व पैदास यांचे क्षेत्र व्यापक झाले आहे.

पंतनगरतर्फे वर्षातून दोन वेळा कृषिमेळावे भरविण्यात येतात. या मेळाव्यांना त्या भागात कृषि-कुंभमेळा असे नाव रूढ झाले आहे. या मेळाव्यात दोन दिवसांच्या कार्यक्रमांत शेतकऱ्यांना प्रायोगिक केंद्र, पशुसंशोधन केंद्र, माहिती केंद्र, बियाणे-जोपासना केंद्र व आजूबाजूच्या शेतकऱ्यांची शेते यांचे दर्शन घडविण्यात येते. त्या भागातील शेतकरी विद्यापीठाच्या साहाय्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल मुक्तकंठाने कृतज्ञता व्यक्त करतात. ○

जसा अंधार पडू लागला तशी माझी आणि शामची छाती धडधडू लागली. आम्ही कसे, केव्हा बाहेर पडायचे आणि कुठे, कुणाला भेटून पसार व्हायचे हे तपशीलवार ठरले होते. प्रत्येक वारकावा नीट चोख आखला गेला होता. सगळी सूत्रे नीट जुळवली गेली होती. कुणाला कसलाही धागा लागू नये याची दक्षता बाळगण्यात आली होती. सारा बनाव ज्या शिताफीने, सावधगिरीने, कौशल्याने आणि कल्पकतेने योजला होता त्याला अनुसरून कुणालाही कसलाही सुगावा लागण्याची सुतराम शक्यता नव्हती. असे असूनही एकूण बेत सुरक्षितपणे पार पडेपर्यंत आम्हांला चैन पडणे शक्य नव्हते. असे अनेक दुवे असतात की, ज्याच्यावर माणूस आपल्या शक्तियुक्तीनिशीदेखील पूर्णपणे नियंत्रण ठेवू शकत नाही. माणसाची निसर्गसिद्ध आणि परिस्थितिसापेक्ष पराधीनता म्हणूनच माझे आणि शामचे रुधिराभिसरण वाढवून होती.



गाव नवे होते. आमची नावेही नवी झाली होती. वेळ पडल्यास सांगताना सहजतेने आठवावी म्हणून वरचेवर मनात त्यांची उजळणी करीत होतो. विसरली जाऊ नयेत म्हणून निवींची मनोमनी आळवणी थांबत नव्हती. आम्हाला ज्या घरचा पत्ता दिला होता तिकडे आम्ही निघण्याची घटिका येऊन ठेपली. आम्ही–शामू आणि रामू–दबत दबत बाहेर पडलो. परंतु आम्ही बाहेर पडल्यावर अमीर आणि याकूब होतो. दबायचे नव्हते. वाकायचे नव्हते. अंगात लखनवी झब्बा, सलवार, पायांत चढाव, डोक्यावर बारीक मखमलीची काळ्या रंगाची तिरकस टोपी आणि डोळ्यांत सुरमा अशा माडी चढण्याच्या ढंगात आम्ही निघालो होतो. आम्हाला सूचना होती की, आमची चाल घाईची किंवा धीमी नसावी. कुणाचे लक्ष जाईल असे बुद्ध्याच काही होऊ द्यायचे नाही. बोलण्याचा किंवा विचारण्याचा प्रसंग आलाच

"और पिछले रास्तेसे हसीनाकी कोठी पूछते जाओ. यह पैसे रखो. फर्मायिश करो. कहो 'रातभर नींद नही आती', ठीक एक बजे निकलो. शायद बेडा पार करते करतेहि तुम्हें गोलिओंकी आवाज सुनायी देगी— खुदा हाफिज"

# 'वह रात फिर न आयेगी'

## सिनिक्

तर एखाद दुसऱ्या वाक्यापलीकडे मजल जाऊ द्यायची नाही. जे उच्चारले जाईल ते अदबीने पण बेफिकीरपणाची झाक व्यक्त करणारे शब्द असले पाहिजेत......

आम्हाला कुणी विचारले नाही. कुणी तसे रोखून पाहिले नाही. म्हणजे आम्ही आमचे पार्ट नीट वठवीत होतो, पण कठीण प्रसंग आला. इम्तियाज अलीचे घर नेमके शोधून काढावयास कुणास तरी विचारण्याची गरज भासली. त्याच्या सूचनेप्रमाणे आम्ही त्याच्या घरी प्रथम खान्यास जावयाचे आणि नंतर हसीनाची कव्वाली ऐकून उत्तररात्री सामसूम झाल्यावर गाव सोडावयाचे असे पलायनाचे मार्ग निश्चित करण्यात आले होते. आम्ही कमालीचे डरलो आतून. आमच्या उच्चारात आणि जबानमध्ये फरक पडला आणि आम्ही तेथील माणसे नाहीत असे कळले तर सत्र तमाशाच अंगलट येणार होता. आणि कुणाला संशय येऊ नये, म्हणून आपसात सल्लामसलत करणे पण टाळत होतो. अगदी अभिमन्यूसारखे व्यूहाच्या आत गुरफटलो-फसलो तर नाही? हीही असहाय्यता मनाला ग्रस्त व त्रस्त करून होती. कल्पनेने काही करता येण्यासारखे नव्हते. अनुभवाची शिदोरी अपुरी पडत होती. सहकार्याचा आणि अन्य साहचर्याचा संपर्क नव्हता. सल्लेगी जागा नव्हती. भरली, आपली शंभर वर्षे भरली. असा निराशेचा तडाखा बसत असतानाच दैव अनुकूल निघाले. शामने ज्या एका दाढीवाल्या म्हाताऱ्यास विचारले, तो सुदैवाने इम्तियाज अलीचा नोकर निघाला. खरे पाहिले तर आपल्या मालकाच्या सूचनेप्रमाणे तो आमच्याकरिताच चौरस्त्यावर आला होता......

त्या म्हाताऱ्याची प्रथम आम्हास भीतीच वाटली. कारण तो बोलत नव्हता.

एक अशी पुसटशी शंका येऊन गेली की, तो मुका तर नसेल ? लगेच मनात तर्क डोकावला आणि सुचवून गेला की, पोलीस अधिकाऱ्यांकडे अशी मुकेपणाची सोंगे घेतलेली माणसे मुद्दामच ठेवलेली असतात; व ती फार पूरक ठरतात. परंतु अशा भीतीने आम्हास पोखरणे फार काळ चालू राहिले नाही. इम्तियाज अलीचे घर येताच तो म्हातारा मोहक सौजन्याने म्हणाला, "आप लोग तशरीफ रखिए, मैं अभी सरकारको इतल्ला करता हूँ की, खुदाकी नेमत आयी है और मकान को उजाला कर रही है।' म्हातारा गेला आणि तेथील बैठकीतल्या लोडांना आम्ही टेकून बसलो. दहा-बारा माणसे बसू शकतील अशी ती खोली होती. अंथरलेल्या आणि व्यवस्थित केलेल्या त्या सुफेद चादरींच्या आसनावर आमच्या अगोदर कुणी बैठक मारली नव्हती हे लपून राहण्यासारखे नव्हते. आमच्याकरता इतका बाजाप्ता इन्तेजाम पाहून आम्हाला लाजल्यासारखे आणि अवघडल्यासारखे झाले. त्या घरात कुणी तरी मान राखायचे आणि मर्जी मोडायची नाही असे मेहमान येणार असल्याच्या इशाऱ्याने हालचाल होती. आवाज होत नव्हता. पण आहट, कानात कुजबुजणे आणि कंगनची मोसूकी कानांवर पडत होती. आम्ही बसलो होतो त्याच्या उजव्या बाजूला एक नक्षीदार पडदा होता. पडद्याच्या वरच्या बाजूला काचेच्या रंगीबेरंगी नळ्यांचे तोरण होते. त्याच्या वरच्या बाजूला हाताने विणलेला हिरव्या पार्श्वभूमीवर सोनेरी रंगातला अर्धा चांद होता. बाकी कमरा पांढऱ्या रंगाने आणि फरशच्या बैठकीने शोभून दिसत होता. शांत-शीतल वाटत होता. त्यामुळे प्रवेश केल्याबरोबर काही क्षण जे आम्हाला अवघडल्यासारखे झाले ते फार काळ टिकले नाही......

इम्तियाज अलीस यावयास वेळ लागला नाही. आमची आणि त्याच्या म्हाताऱ्या नोकराची गाठ पडल्याने त्याचे घर शोधावयास मुळीच प्रयास पडले नाहीत हे ऐकून त्याने सुटकेचा निःश्वास टाकला. आमच्याशी थोडे बोलून तो आत गेला पडदा बाजूस सारून. माझ्या डोळ्यांच्या कोपऱ्यांतून मला पडद्याआड एक तरुणी आणि प्रौढा दिसली. इम्तियाज अलीची बेटी आणि बेगम असावी. आपल्या घरी कोण कोण आहेत, याबद्दल तो बोलला होता. तेवढीच माणसे होती. त्याला एकच मुलगी होती आणि त्याची पाच मुले काळाने हिरावून नेली होती. त्याच्या जिंदगीत जेव्हा जेल-अधिकाऱ्याची-बढतीची जागा मिळाली व बरकतीचे दिवस आले तेव्हा त्याचा उरला सुरला एक मुलगाही जालीम जमान्याने हिरावून नेला. तो मुलगा त्याच्या इतर मुलांच्या मानाने अधिक बुद्धिमान होता. मॅट्रिकला पहिला आला होता. कॉलेजच्या पहिल्या वर्षात असताना बेदर्द किस्मतने कळी खुडली होती. आता सारा जीव होता ती मुलगी. लख्ते जिगर-काळजाचा तुकडा-असे इम्तियाज अली तिच्याबद्दल जे म्हणाला, ते वस्तुतः इतके खरे क्वचितच प्रत्ययास येते.

—मी दाराजवळ होतो आणि पडद्यामागून माझ्या कानांवर हळुवार, श्वासः

किंचित आवरलेली खुसखुस पडली. मी कान देऊन ऐकण्याचा प्रयत्न करू लागलो. कुणी बायकी आवाज विचारत होता ' दोनों में कौनसा लडका ? " इम्तियाज अली नजाकतभऱ्या स्वरांत पुढे पुटपुटला, " वह जो दरवाजेके पासके तकियेको टेककर शाही थाटसे बैठा है वही –" नंतर " मेरी बेटी नसीबकी — " म्हणत त्या स्त्रीने बोटे मोडल्याचा आवाज. त्यांवर ' अम्मीजान, मैं नाऽऽऽचा ' लडिवाळ रुसवा. मग 'अहेस्ता, बाहेर सुन न पाये –' असा तकलुबी दम—


आम्ही जिथे बसलो होतो तिथे तीच त्यांच्या जेवणाची जागा होती. गोश्त, मीठा खाना, परोठे, दहीवडे असा जेवणाचा बेत होता. आग्रहाने वाढले जात असताना माझ्या मनात आले की, आम्ही ना नात्याचे, ना गोत्याचे, आळीतले ना चाळीतले. इम्तियाजला का बरे आमची कणव यावी ? प्रेम – आस्था वाटावी ? मग मागचा आठवडा आठवला. तुरुंगाचे जेवण घेणार नाही या निर्धारात माझा आणि शामचा पुढाकार होता. आम्हाला शिधा द्या आणि आम्ही शिजवून खाऊ, अशी आमची मागणी होती. उलट-सुलट उत्तरे, धमक्या – प्रतिधमक्या आणि दमदाटी झाल्यावर शेवटी इम्तियाजने आम्हा राजकीय कैद्यांना शिधा देण्याची मंजुरी आणून घेतली. ती घेतल्यावर तो फेरी संपवून आमच्याजवळ आला होता. आणि जवळकीच्या मायेने द्रवला " इतक्या कोवळ्या वयात, शिक्षण सोडून, आणि आईबापांना काळजीत लोटून तुम्ही या बुजुर्गांच्या खेळात का पडला ? "

" ते तुमच्या निजामाला विचारा — " असे मी तुटक उत्तर दिले. इम्तियाज अली त्यावर फारसे काही न बोलता चूल फुंकून फुंकून लाल झालेल्या आमच्या डोळ्यांकडे पाहत तो निघून गेला. तो गेल्यावर शाम म्हणाला, " त्याला असं कटवणारं उत्तर द्यावयास नको होतं. आपला लढा एका व्यक्ती किंवा जाती-विरुद्ध नाही. त्यात हा माणूस वेगळा दिसतो. दयाळू अंतःकरणाचा वाटतो – " मलाही वाटले की, मी तितक्या खाडूपणाने उत्तर द्यावयास नको होते. दोन दिवसांनी इम्तियाज अलीने पुन्हा तो विषय काढला तेव्हा मी काही बोललो नाही. शाम म्हणाला, " आम्ही काही माफी मागणार नाही सुटकेसाठी — "

" माफीच कशाला मागायला पाहिजे सुटकेकरिता ? दुसरे मार्ग असू शकतात. परन्तु एक लक्षात ठेवा की, तुम्ही जर आपले शिक्षण पुरे केलेत आणि घरची जिम्मेदारी घेतलीत तर तुम्हांला आई – वडिलांचे आशीर्वाद आणि सर्वांचा दुवा मिळेल. समाजाला लायक, समर्थ आणि स्वयंपूर्ण माणसाचा जास्त आणि खरा उपयोग होतो. तुम्ही, म्हणून, आपली विद्यार्थिदशा समाधानाने पूर्ण करा — " इम्तियाज अलीच्या बोलण्यात उपदेश मुळीच वाटला नाही. वात्सल्य ओतप्रत होते. मी अधीरतेने म्हणालो, " आता एकदा उडी घेतलीच आहे तर शिक्षा संपेपर्यंत माघार नाही — "

" माझे म्हणणे पटले ना तुम्हांला ? ' – त्याने विचारले. आम्ही दोघेही हो

दोन-किंवा तीन मुले पुरेत



कुटुंब नियोजन केंद्राची-खूण लाल त्रिकोण

davp 68/270

म्हणालो आणि इम्तियाजअली नुसता हसला आणि गेला. – आणखीन दोन दिवसांनी आम्ही दोघेच बोलत बसलो आहोत हे हेरून इम्तियाज आला आणि कानात कुजबुजला, " तुमच्या सुटकेचा मार्ग सापडला आहे — "

" तो कसा ? "

" पळून जाण्याचा — "

" पण ते कसे ? "

" माझ्या मदतीने — "


आणि आज रात्री दोन वाजता इम्तियाज अली एकदम जेलची तपासणी करणार होता. आणि आम्ही तिथे जेलमध्ये नाहीत हे दिसताच शिट्या फुंकल्या जाणार होत्या. पळापळ होणार होती. गोळ्या सुटणार होत्या. शेवटी आम्ही पळून गेलो, जाताना आम्हांला गोळ्या लागल्या पण आम्ही कशीबशी हैद्राबादची वेस ओलांडली आणि कदाचित् तेथेच हा इहलोक सोडून गेलो, असा रिपोर्ट होणार होता —

" क्या सोच रहे हो ? निवाला हाथ में, मुँ खुल्ला और आँखें गुमी हुअी – पहले पेटभरके खा तो लो. क्या कुछ भी पसंद नहीं — ? "

" नहीं, वैसी बिल्कुल बात नहीं — "

— अगदी सपाटून जेवण झाले. मेवा खाल्ला. पुन्हा पाणी प्यालो. पोट, मन आणि डोळे भरले. इम्तियाज अलीस कोणत्या भाषेत भावना प्रकट करावी या करिता धडपडू लागलो, तडफडू लागलो. त्याने आमच्या खांद्यावर मायेने हात ठेवीत म्हटले, ' तकलुफकी कुछ जरूरत नहीं. मैं समझता हूँ, अब इसी हिम्मतसे कदम वढाव, आगे वढो, यह मोतिए के गजरे हातपर लपेटो, छैला बनो और पिछले रास्तेसे हसीना की कोठी पुछते जाओ यह पैसे रखो. फर्मायिश करो. कहो ' नींद रातभर नहीं आती ' सुना. ठीक एक बजह निकलो. शायद बेडा पार करते करतेही तुम्हे गोलिओंकी आवाज सुनायी देगी—खुदा हाफिज ! "

— आजपर्यंत त्या गोळ्यांचा आवाज कानांवर आला नाही. आणि इम्तियाज अलीचा निरोप मोगरीच्या कळीसारखा कानात सुगंधत आहे ! ○



## ४


**लेखक**

ब्रिगेडिअर जे. पी. दळवी

**अनुवादक**

अॅडव्होकेट माधव कानिटकर

भारताच्या उत्तर सरहद्दीला चीनपासून नजीकच्या काळात धोका उत्पन्न होईल व पाकिस्तानकडून भारतावर केव्हाही आक्रमण होण्याची शक्यता आहे याची जाणीव पंडित नेहरूंना १९५७ पासूनच झाली होती; पण काय केले असता हे दोन्ही धोके टाळता येतील, याबाबत त्यांच्या मनाचा गोंधळ उडाला. हे दोन्ही धोके टाळण्यासाठी त्यांच्यापुढे फक्त दोनच मार्ग उरले होते. पहिला मार्ग असा की, सर्व खर्चिक योजना रद्द करून, औद्योगिक प्रगतीबाबत अनेक भाषणांतून भारताच्या जनतेला दिलेली भ्रामक वचने आणि आश्वासने चुकीची होती असे कबूल करून ती मागे घ्यायची आणि सर्व लक्ष संरक्षण व सैन्य या विषयांकडे पुरवून पाकिस्तान किंवा चीन यांच्याबरोबर केव्हाही लढाई करण्याची जय्यत तयारी करायची. पण हा मार्ग पंडित नेहरूंना फारसा पसंत नव्हता. नवभारताबद्दलची त्यांनी रंगवलेली सर्व स्वप्ने, तो औद्योगिक क्षेत्रातला प्रगत भारत, जागतिक शांततेसाठी झटणारा भारत, समाजवादी भारत—जो त्यांनी अनेकदा आपल्या भाषणांतून रंगवला होता—तो भारत यामुळे 'तसा' बनणार नव्हता. शिवाय पंडितजींना कल्पना होती की, आपली सगळी दिवास्वप्ने धुळीला मिळवून सर्व लक्ष संरक्षणावर मर्यादित केले, तरीदेखील ते अपुरेच पडेल. आपल्याला तरीदेखील 'बाहेरून' शस्त्रास्त्रांची मदत घ्यावीच लागेल. कारण पाकिस्तान व चीन यांच्याबरोबर होणारी संभाव्य लढाई ही वेगवेगळ्या प्रकारची होती. पाकिस्तानबरोबर लढायचे होते ते सपाट प्रदेशात आणि चीनबरोबर लढायचे होते ते दुर्गम पहाडी प्रदेशात. दोन्ही ठिकाणच्या लढायांचे स्वरूप आणि लागणारी शस्त्रास्त्रे वेगवेगळ्या प्रकारची होती. सपाट प्रदेशात रणगाडा ठीक आहे, पण




हजारों फूट उंच हिमालयाच्या शिखरांवर ? द्रुतगती विमाने आणि फसवी योजनाच हवी. पण पंडित नेहरूंना संरक्षणापेक्षा भारतातील जनतेचा ओंगळपणा आणि दारिद्रय यांची अधिक चीड होती. पंडित नेहरू ही एकच व्यक्ती त्या वेळेला भारताचे दारिद्रय आणि ओंगळपणा नष्ट करून टाकण्यासाठी जिवापाड मेहनत घेत होती. बरे, एवढे करून दुसरा मार्ग पंडितजींपुढे हा होता की, शस्त्रास्त्रे बाहेरून घ्यायची. पण ती कुणाकडून घेणार ? इंग्लंड किंवा अमेरिका ! कारण, भारतीय सैन्याच्या युद्धतंत्रांचा, शस्त्रास्त्रांचा वारसा होता ब्रिटिशांचा. पश्चिमी राष्ट्रांची शस्त्रास्त्र–वाहतुकीला वाटेतच अचानक निर्माण होणारी बंदी, शस्त्रास्त्रांच्या सुट्या भागांचा पुरवठा हे प्रश्न तर होतेच, पण या दुसऱ्या मार्गाने जाण्यातदेखील पंडितजींना धोका होता. तो हा की, भारताला त्याचे तटस्थतेचे धोरण सोडावे लागले असते. ब्रिटन आणि अमेरिका यांनी काही अटी घातल्याशिवाय मदत दिली नसती. त्यांतली महत्त्वाची अट कदाचित ही पुढे आली असती की, मदत म्हणून तुम्हांला दिलेली ही शस्त्रास्त्रे भारताला पाकिस्तानविरुद्ध वापरता येणार नाहीत. मग उपयोग काय त्यांचा ? पाकिस्तान ब्रिटिशांचा दोस्त होता. पाकिस्तानला जन्मच मुळी दिला होता ब्रिटिशांनी. हे त्यांचे 'पुत्रप्रेम' आपल्याला नडत होते. अमेरिका आणि ब्रिटन हे भारत आणि पाकिस्तान यांना शस्त्रास्त्र पुरवठा करण्याची तयारी दाखवत असतानादेखील एका गोष्टीची काळजी घेणार होते की, दोघेही शिरजोर होणार नाहीत. विशेषत: भारत ! कारण आधीच दुसरे महायुद्ध गाजवणारे भारतीय जवान आणि त्यात त्यांच्या हातांत अद्ययावत शस्त्रास्त्रे. 'पाकिस्तान' हा शब्द होता का नव्हता करून टाकतील. आणि ते होता कामा नये. पाकिस्तान टिकले पाहिजे, तरच जागतिक सत्ता-

स्पर्धेत ब्रिटन-अमेरिका यांना रशिया-चीनला शह देणे जमेल. शिवाय भारताच्या दैदीप्यमान प्रगतीमुळे, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताला जे महत्त्व प्राप्त होऊ पाहत होते त्यामुळे ब्रिटिशांना आणि अमेरिकेला भारताला कमजोर करायचेच होते. आणि आगीत तेल पडावे तसे कुठल्याही महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नात भारत ब्रिटन-अमेरिकेला जोरदार विरोध करीत असे. केवळ सत्य, न्याय आणि शांतता या शब्दांच्या कच्छपी लागून. पण त्याचबरोबर ' न ब्रूयात सत्यं अप्रियम् ' हे पंडित-जींना कळायला हवे होते. उदाहरणार्थ, सुएजच्या कालव्याच्या प्रश्नावर आणि हंगेरीच्या प्रश्नावर १९५६ मध्ये भारताने अमेरिकेला कडाडून विरोध दर्शवला. अमेरिकेने भारताशी वर वर दोस्ती ठेवली, पण ही खूणगाठ बांधून की, भारत आता फारच माजला, आम्हांला विरोध करतो आणि पुन्हा आमच्याकडेच शस्त्रा-स्त्रांची मदत मागतो. तीही देऊ, पण पाकिस्तानला जास्त मदत देऊ. तरच भारता-वर थोडा ' चेक ' राहील.

पंडित नेहरूंचे दोन्ही ' रस्ते ' असे बंद झाले होते. परकीय मदत घ्यावी तर तटस्थतेचे धोरण सोडून द्यावे लागेल. न घ्यावी तर सर्व पंचवार्षिक योजना वगैरे शब्द विसरावे लागतील.

१९५७ मध्ये पंडित नेहरू अशा गोंधळलेल्या मन:स्थितीत असताना तिसरा एक मार्ग होता. तो म्हणजे खेडेगावात ' सोमवारच्या बाजारात ' वस्तू विकायला ठेवा-व्यात तशा तऱ्हेने फ्रान्स आणि स्वीडन हे अद्ययावत शस्त्रास्त्रे कुणालाही विकायला तयार होते. तटस्थतेचे धोरण सोडायला नको, योजना रद्द करायला नकोत, कुणाच्या गोटात सामील व्हायला नको. पण खरेदीला जायचे तर खिशात पैसा पाहिजे ना? भारताजवळ पुरेसे परकीय चलन नव्हते. खरेदीला पैसा नव्हता. आधीच भारताला इंग्लंड-अमेरिकेचे कर्ज डोईजड झाले होते. हे कर्जाचे तारू केव्हा फुटेल त्याचा नेम नव्हता. पठाणाचे कर्ज ' बाकी ' ठेवून एखादा इसम खिशात पैसे खुळखुळत खरेदीला निघाला तर पठाण त्याला वाटेतच गाठतो. पाकिस्तानच्या हितासाठी इंग्लंड-अमे-रिकेने हे पाहणीकाम केले असते. भारताला ठणकावून सांगितले असते की, ' आधी आमचे पैसे टाका आणि मग निघा खरेदीला. ' किंवा ती दोन्ही राष्ट्रे या निर्णया-पर्यंत पोचली असती की, भारत आमच्या विरोधकांकडून शस्त्रास्त्रे खरेदी करतो काय ? आता नवीन कर्ज आणि कुठलीही मदत भारताला द्यायची नाही. पंडित नेहरूंना हा तिसरा मार्गदेखील मोकळा नव्हता. इंग्लंड-अमेरिकेचे कर्ज आणि मदत थांबली की, आपल्या योजना थांबल्याच. आणि त्या तर महत्त्वाच्या. आपल्या योजना मदतीविना अडकून पडल्या हे पाहून हसतील ना जगातली सगळी राष्ट्रे. आणि त्या वेळी तर आपण आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मध्यापर्यंत आलो होतो. अचानक अमेरिकेने मदत बंद केली असती तर केलेला खर्च फुकट गेला असता. शिवाय डोक्यावर कर्जाचा भार वाढतोच आहे.

एखाद्या मध्यमवर्गीय कारकुनाची महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जी मन:स्थिती असते ती त्या वेळी भारताच्या पंतप्रधानांची होती.

या अडचणींतून मार्ग काढायचा कसा? चीनला सरळ सरळ शत्रू नंबर एक म्हणून जाहीर करायचा. काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानशी तडजोड करायची. तटस्थतेचे धोरण सोडून देऊन सरळ अमेरिकन गोटात शिरायचे आणि चीनपासून रक्षण करण्यासाठी भारत-पाकिस्तान यांनी हातमिळवणी करून संयुक्त संरक्षक फळी उभी करायची तर काही जमेल. अमेरिकेला हेच व्हायला हवे होते. एवढेच नव्हे तर भारताने पाकिस्तानबरोबर नमते घेऊन चीनविरुद्ध उभे राहावे अशी अटच अमेरिका कदाचित मदत देताना घालील ही भारताची त्या वेळची काळजी होती. कल्पना करा, की भारत तें करायला तयार झाला असता तर? तरीदेखील भारत अडचणीत आला असता. कारण चीन आणि रशिया या दोन्ही कम्युनिस्ट राष्ट्रांचे आपसांत प्रेम आणि रशिया तर आपला दोस्त. १९५५ मध्ये श्री. निकिता क्रुश्चेव्ह व मार्शल बुल्गानिन यांनी भारताला भेट दिली. भारतीय जनतेने ठिकठिकाणी या उभय रशियन नेत्यांचे अक्षरश: प्रचंड आणि उत्स्फूर्त स्वागत केले. जगामध्ये या स्वागताची फारच चर्चा झाली. भारताचे महत्त्व वाढले. आश्चर्य एवढेच वाटते की त्याच वेळी 'रशियन - हिन्दी भाई भाई' ही घोषणा का जन्माला आली नाही? रशियन नेते श्री. निकिता क्रुश्चेव्ह हे मुरब्बी राजकारणी आणि पट्टीचे वक्ते. या भारतभेटीतच त्यांचे स्वागत पाहून ते 'खूष' झाले म्हणून नव्हे तर राजकारण म्हणून त्यांनी भारताला नि:संदिग्ध वचन दिले की, "काळजी करू नका. तुम्ही आमचे आहात. रशिया तुम्हांला सर्व प्रकारची मदत आणि पाठिंबा देईल!" कशासाठी? भारताबद्दल खरोखरच प्रेम उत्पन्न झाले म्हणून? छे: छे:! अमेरिका, पाकिस्तान यांच्या रशियाविरुद्ध आणि कम्युनिझमविरुद्ध झालेल्या युतीला टोला हाणण्यासाठी. आन्तरराष्ट्रीय राजकारण हे असे असते. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे. ह्या भारताच्या मागणीला युनोमध्ये रशियाने जोरदार पाठिंबा दिला. शेवटी रशियाने त्यांचा 'व्हेटो'चा हक्क गाजवला पण काश्मीर भारताचा आहे हे समर्थन सोडले नाही. व्हेटो वापरल्यानंतर काय करणार अमेरिका? औद्योगिक क्षेत्रात भारताची प्रगती व्हावी म्हणून रशियाने भरपूर मदत दिली. त्यांचे तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ आणि इंजिनीयर्स भारताला पुरविले. अशी मदत इंग्लंड-अमेरिकेनेदेखील केली नव्हती. कारण त्यांची तशी मदत करण्याची इच्छाच नव्हती. भारतीय नेत्यांची फार पंचाईत होणार होती. कारण अमेरिकन गोटात शिरून चीनला शत्रू म्हणून जाहीर करायचे तर रशिया दुखावला जाईल; कारण चीन आणि रशिया यांचे आपसांत साटेलोटे निदान त्या वेळी तरी होतेच. आपली स्थिती त्या वेळी 'धोबीका कुत्ता न घरका न घाटका' अशी झालेली होती. रशिया भारताला मदत देत होता तशी चीनला पण मदत देत होता. रशियाकडून चीनला

होणाऱ्या या मदतीत चिनी सैन्य प्रबळ होईल, अशा तऱ्हेची शस्त्रास्त्रांची मदत-देखील होती. उलटपक्षी, रशिया आपल्याला फक्त काश्मीर प्रश्नावर पाठिंबा देऊन, इतर सर्व ' मदत ' देत होता. पण शस्त्रास्त्रांची मदत मात्र रशिया भारताला करणार नव्हता. भारताची त्या वेळची भूमिका अशी होती, की रशिया भारताला शस्त्रास्त्रपुरवठा करीत नसला तरी निदान काश्मीर प्रश्नावर दमदार भाषेत भारताचे समर्थन करतोय ना ? औद्योगिक क्षेत्रात तरी मदत देतोय ना ? काही कमी नाही. रशियासारखे प्रबळ राष्ट्र आपले दोस्त आहे.

......पण मित्राचा मित्र तोदेखील आपला मित्रच असला पाहिजे. चीनला दुखा-वणे म्हणजे रशियाला पण दुखावणे. एकाच वेळी दोन ' मित्र ' (?) दुरावतील ना ! ते नको.

शिवाय आन्तरराष्ट्रीय क्षेत्रात कुठल्याही दोन राष्ट्रांत तणातणी झाली की जरूर असो किंवा नसो ' तुमचे भांडण शांततापूर्ण वाटाघाटी करूनच सोडवा ' हा सल्ला अट्टाहासाने भारत देत असे. भारताला चिंता ही होती की, न जाणो या भांडखोर राष्ट्रांपैकी एखाद्या फटकळ राष्ट्राने प्रत्यक्ष पंडित नेहरूंना कडक खलिता पाठवला असता की, ' पंडितजी ! आम्ही शांततापूर्ण वाटाघाटी करून प्रश्न सोडवावेत असं म्हणता. मग तुम्ही अमेरिका आणि रशिया यांच्याकडून शस्त्रास्त्रांची मदत घेता ती कशासाठी ? शांततापूर्ण वाटाघाटींनी प्रश्न सुटत नाहीत. उलट गुंतत जातात म्हणूनच ना ? ते शांततेचे प्रयोग तुम्ही करा. आम्ही कुठल्या मार्गांनी जायचं ते आमचं आम्ही बघू! '

पंडित नेहरूंना हे व्हायला नको होते. आन्तरराष्ट्रीय क्षेत्रात केवढी शान वाढत होती भारताची. जगातले एक मातबर राष्ट्र, शांततेसाठी झटणारे राष्ट्र, प्रगतिशील राष्ट्र म्हणजे भारत. भारताची ही प्रतिमा धुळीला मिळेल ना ! स्वातंत्र्य मिळून आत्ता कुठे दहा वर्षे होत होती. इतक्या लवकर तटस्थतेचे धोरण सोडून देऊन अमेरिकेचा किंवा रशियाचा बगलबच्चा होणे बरे नव्हे. शस्त्रास्त्रांची मदत मिळवत राहिलो तर इतर राष्ट्रे आपल्याला युद्धखोर म्हणतील.

पंडित नेहरूंचे सगळे रस्ते असे बंद झालेले. पण किती झाले तरी पंडितजी बॅरिस्टर होते. त्यांनी मार्ग काढलाच आणि तो असा की, चीनशी मैत्री ठेवावयाची, अमेरिकेशी पण ठेवायची आणि अमेरिकेच्या शब्दांवर विश्वास ठेवून त्यांच्यामार्फत पाकिस्तानवर दाब ठेवायचा. एकीकडे भारताची औद्योगिक प्रगती चालू ठेवायची. जगात शांततेसाठी झटणारे राष्ट्र म्हणून भारताची शान वाढवीत राहायचे. पंडितजी आपल्या भाषणांतून नेहमी जोरदार भाषेत सांगत असत की, ' कुठल्याही राष्ट्राची शक्ती ही फक्त सैन्यबळावर अवलंबून नसते. सैन्याबरोबरच राष्ट्राची औद्योगिक प्रगती आणि जनतेचे चारित्र्य (Morale of The People) याही गोष्टी राष्ट्राची ताकद ठरवीत असतात ! '

एकदा का पंडितजींनी एखाद्या मार्गाने जायचे ठरवले की ते त्या मार्गाचा अट्टाहासाने पुरस्कार करीत. पंडितजींनी शोधून काढलेला मार्ग हा खरा परिस्थितीने त्यांना शोधायला भाग पाडलेला मार्ग होता. पंडितजींचे विचार आणि अंदाज खरे ठरले नाहीत. एका दृष्टीने पंडितजींचा हा अजब मार्ग बरोबरदेखील होता. दुर्दैवाने तो फसवा निघाला. पाकिस्तान आणि चीन या दोन्ही शेजाऱ्यांचे शत्रुत्व एकाच वेळी ओढवून घेणे इष्ट नव्हतेच. या दोन्ही राष्ट्रांबरोबर होणाऱ्या संभाव्य लढाया वेगवेगळ्या प्रकारच्या प्रदेशांत वेगवेगळ्या प्रकारांनी लढायच्या होत्या. जगातली मोठी राष्ट्रेदेखील एकाच वेळी दोन दोन सरहद्दींवर लढत नाहीत. कुठली तरी एक बाजू सामोपचाराने मिटवून टाकतात. भारतासारख्या नुकत्याच स्वतंत्र झालेल्या, आर्थिक क्षेत्रात 'गरीब' असलेल्या राष्ट्राने चीनला शत्रू म्हणून जाहीर करणे, त्याच वेळी पाकिस्तानबरोबरदेखील शत्रुत्व ठेवणे म्हणजे आत्मनाश करून घेण्यासारखे होते. कारण, भारताजवळ सैन्य व संरक्षण यांच्यावर खर्च करण्यासाठी पैसा नव्हता. जेवढा शक्य असेल तेवढाच पैसा (Available Funds) फक्त संरक्षणासाठी उपयोगात आणला गेला असता. त्याचा परिणाम असा झाला की आपली नाही धड औद्योगिक प्रगती झाली, की नाही संरक्षणाची तयारी झाली. सगळाच 'अर्धवट' कारभार.

अगदी स्पष्ट बोलायचे तर त्याच वेळी सरकारला कुणीतरी स्पष्ट आणि शहाणपणाचा सल्ला द्यायला हवा होता की, 'चीनसारख्या प्रबळ राष्ट्राबरोबर लष्करी सामना द्यायची आपली तयारी नाही ना ? मग चीनबरोबर होणाऱ्या संभाव्य युद्धाची कारणे शोधून काढा, अभ्यास करा, आणि शक्यतो चीनबरोबरचे मतभेद वाटाघाटी करून मिटवून टाका.' भारत सरकारच्या सुदैवाने १९५४ ते १९५७ हा ३–४ वर्षांचा काळ असा होता की, त्या वेळी चीनची आणि आपली मैत्री होती. त्या




मैत्रीच्या 'हवे'चा फायदा उठवायला हवा होता. चीनने त्या तडजोड नक्की केली असती. कारण भारत सरकार त्यांना जे काही देणार होते तेदेखील त्यांचे नव्हतेच. शिवाय असे करण्यात भारत सरकारची अब्रू वाचली असती. कारण, भारतीय जनतादेखील त्या वेळी फारशी भावनेच्या आहारी गेली नव्हती. भारतीय जनता आरोळ्या ठोकीत होती त्या 'हिंदी-चिनी भाई भाई'च्या. थोडक्यात आटोपले असते. आता प्रेम टिकवायचे म्हणजेच थोडेफार नुकसान होणारच !

जर का राष्ट्राची औद्योगिक प्रगती आणि जनतेची नीतिमत्ता (!) यासाठी युद्ध शक्यतोवर टाळायचे ठरले होते तर निदान तडजोड तरी वेळेवर करायची. मग एकीकडे नुसतेच तोंडाने 'इंच इंच लढवू !' किंवा 'जिंकू किंवा मरू !' ह्या भलत्याच भावनेच्या आहारी जायचे नाही. कारण 'इंच इंच' लढवायला ताकद, पैसा आणि शस्त्रास्त्रे लागतात. कुणी सांगावे ? त्या मैत्रीच्या वातावरणात कदाचित भारत आणि चीन या दोन्ही राष्ट्रांना मान्य होईल अशी उभयपक्षी सन्माननीय तडजोड निघालीही असती. कारण त्या काळात सर्वसामान्य भारतीय माणसाला लडाख आणि नेफा हे शब्ददेखील ठाऊक नव्हते, मग जगाच्या नकाशात ते नक्की कुठे आहेत ? कुणाचे आहेत ? चीनचे, का आपले, या ज्ञानाबद्दल न बोललेलेच बरे. चीनबरोबर अपुऱ्या तयारीने लढून, दारुण पराभव पत्करून जगात आपली नाचक्की करून घेण्यापेक्षा चीनशी 'सन्माननीय तडजोड' काय वाईट होती ? उगाच भावनेच्या आहारी जाऊन विचार करू नका. व्यवहारी आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून विचार करा. दहा अंक मोजून शांतपणे विचार करा. नाहीतर माझ्यासारख्या ब्रिग्रेडियरलादेखील 'चीनवादी', 'राष्ट्रद्रोही' म्हणून शिव्या मिळायच्या. कारण मी चिन्यांच्या तुरुंगात होतो ना. माझे ब्रेनवॉशिंग (!) झाले असणारच. विचार करा, जो लडाख आणि नेफा पंडित नेहरूंच्याच शब्दांत सांगायचे तर 'तिथे गवताचे एक पातदेखील उगवत नाही' या लायकीचा होता. तोच अचानक भारताचा मानबिंदू कसा काय ठरू शकतो ? एखाद्या प्रदेशाची आधी हेटाळणी करायची, तिथे दुर्लक्ष करायचे, लढाईची तयारी करायची नाही आणि आपल्या या चुकांचा फायदा आपल्यापेक्षा जास्त हुशार माणसांनी उठवला की ते लगेच 'माणुसकीचे शत्रू' म्हणून त्यांना शिवी हासडायची. 'युद्ध आमुचे सुरू' (तयारी नसताना) म्हणून लोकांना उगाच चेतवायचे याला काही अर्थ आहे ? तुम्ही आधीच सावध असतात तर हिंमत होती चिन्यांची 'माणुसकीचे शत्रु' होण्याची ? 'राष्ट्र' या शब्दाबद्दल भारतीय जनतेच्या भावनांशी मी सहमत आहे. हाडाचा लष्करी अधिकारी आहे मी. पण स्पष्ट बोलतो, माफ करा. आपली लढण्याची तयारी नाही हे भारत सरकारने भारतीय जनतेला स्पष्ट कधी सांगितले नाही. कारण, भारतीय जनतेने लगेच सरकारला बजावले असते की 'तसं असेल तर खाली उतरा सत्तेवरून.' नेहमीच भावनेच्या भरात वाहवत जाणारी 'जनता' – ज्या जनतेचा आपल्या

'जवानांवर'– अज्ञानात असून का होईना–पण उदंड विश्वास, श्रद्धा आणि प्रेम आहे, ती जेव्हा राष्ट्रीय प्रेरणेने चिडली, चवताळली, त्या वेळी जनतेचे हे रौद्र रूप पाहून भारत सरकारला चीनबरोबर लढण्याचा घातुक, शहाणपणाचा अभाव असलेला निर्णय घाईघाईने घ्यावाच लागला. कारण चीनवर भारतीय जनता इतकी खवळली होती, राष्ट्रप्रेम इतके उसळून आले होते, की १९६२ मध्ये जर का भारत सरकारने जनतेला जाहीर केले असते की, 'काय करणार? १९४७ पासून आमची धोरणे चुकत गेली. अंदाज खोटे ठरले. आपली लढाईची तयारी नाही. तर भारतीय जनता आणखी खवळली असती आणि तिने सरकारच खाली खेचले असते.

सरकारला आपली 'खुर्ची' टिकवायची होती. लढण्याची आपली तयारी नाही हे ठाऊक होते. लोक खवळलेले आहेत हेही ठाऊक झालेच होते. पण त्याचबरोबर भारत सरकारला हेही ठाऊक होते की, भारतीय जनतेचे भारतीय सेनेवर भलतेच प्रेम आणि श्रद्धा आहे. आता सैन्य पाठवू तरच लोक शांत होतील. 'अजापुत्रं बलिं दद्यात् देवो दुर्बल घातकः' असं म्हटलंय ते काय उगाच?

भारताचे भवितव्य ठरवणाऱ्या घटना या दिशाहीन प्रवाहावरोबर वाहत जात होत्या. चीनची दांडगाई म्हणजे लोकसभेत पंडित नेहरूंचे कडक टीकाकार म्हणूनच प्रसिद्धी मिळालेल्या विरोधी पक्षाच्या खंद्या नेत्यांचे पंडितजींना कडवट भाषेत झोडपण्याचे एक साधनच ठरले. चीनच्या प्रश्नावर लोकसभेत भडीमार झाला की पंडित नेहरू त्यांचे समर्थन करताना पोकळ शब्दांचे अवडंबर माजवून वेळ मारून नेत. आपल्या शब्दांमागे बंदुकांची ताकद नाही हे माहीत असून पंडितजी ढबदार भाषेत 'आपली जय्यत तयारी आहे' असाच लोकसभेचा आणि भारतीय जनतेचा गैरसमज व्हावा अशी भरमसाट विधाने करीत. एकदा का आपली भूमी चिन्यांनी कुरतडायला सुरुवात केली आहे हे लोकांना कळले की, लोक संतप्त झालेच. आणि त्या वेळी जर का नेहरूंनी 'चीनबरोबर शांततापूर्ण वाटाघाटी' हे वाक्य जरी उच्चारले असते तरी देशात प्रक्षोभ निर्माण झाला असता. त्याचा अर्थ भारतीय जनतेने असाच घेतला असता की, भारत सरकार दुबळे आहे. सरकारने चीनपुढे सपशेल लोटांगण घातलेले आहे. तसे काही जनतेला वाटू नये म्हणून दमदार भाषा वापरण्याशिवाय पंडित नेहरूंना गत्यंतरच नव्हते. लोकसभेच्या अधिवेशनात भारत सरकारवर विरोधी पक्षांचे तुफानी हल्ले सुरू झाले. वातावरण तंग होऊ लागले. शाब्दिक चकमकी उडू लागल्या. चर्चा अक्षरशः गरम वातावरणात झडू लागल्या. त्यामुळे चिनी आक्रमणाचा प्रश्न भारत सरकारने आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न बनवला. पंडितजींची पंतप्रधान या नात्याने दयनीय अवस्था झाली. जाहीर सभेत एखाद्या विरोधी पक्षावर संतप्त होऊन 'ये क्या तमाशा है!' 'जहान्नम में जाऽऽव!' या भाषेत दमदाटी करणाऱ्या पंडित नेहरूंची पंचाईत झाली होती. कारण लोकसभा म्हणजे काँग्रेस पक्षाची जाहीर सभा नव्हती.

पंडित नहरू व कॉंग्रेस सरकार यांच्यावर गंभीर आरोप करून त्यांच्यावरच चीन-कडून घडत असलेल्या प्रमादांची जबाबदारी टाकणे आता विरोधी पक्षाला सोपे झाले होते. पंडित नेहरूंच्या तोंडावर लोकसभा सदस्य आरोप करीत होते, "पंडि-तजी ! तुम्ही देशाच्या संरक्षणाकडे दुर्लक्ष केलेत. तुम्ही पराभूत मनोवृत्तीचे आहात. तुम्ही भारताची शान धुळीला मिळवलीत. तुम्ही कष्टाने मिळवलेले स्वातंत्र्य धोक्यात आणलेत. तुम्ही चीनबरोबर दोस्ती ठेवण्यासाठी आपली पवित्र जमीन-देखील देऊन टाकायला कमी करणार नाही. चीनने ही काय भारताची चेष्टा चालवली आहे ? ये क्या तमाशा है ! बोला ! आत्ताच्या आत्ता बोला ! या पूर्वी-देखील पंतप्रधान या नात्याने तुम्ही आम्हांला खरी वस्तुस्थिती का कळवली नाहीत ?" विरोधी पक्षांकडून आलेले हे बाँबगोळे झेलणे पंडितजींना कठीण जात होते. कुणालाही पंतप्रधानांची दया यावी अशी त्या वेळची अधिवेशने गाजली. कारण प्रत्येक भारतीय माणसाला हे ठाऊक होते की, जवाहरलाल नेहरू हा भारताचा थोर सुपुत्र आहे. चांगल्या भावनेनें ते काहीतरी करायला गेले. त्यांचे अंदाज फसले. देश धोक्यात आला. पण ..... पण पंडित जवाहरलाल नेहरूंनी हे मुद्दाम केलेले नाही. हा माणूस हाडाचा बॅरिस्टर नव्हे तर कवीच आहे. फसवला गेला बिचारा.

आणि त्याचबरोबर विरोधी पक्षांच्या या हल्ल्याला तोंड देत असताना, त्यांच्या खोचक, बोचक, पण अचूक प्रश्नांना उत्तरे देणे पंडित नेहरूंना भारी पडले. कारण त्यांनाही हे आतून पटले होते की, 'आपण चीनवर विश्वास ठेवला ही आपली चूक झाली.' भावनाप्रधान माणसे ही थोडीफार अविचारीच असतात. कार्यकारणभाव त्यांना कधी समजत नाही. प्राप्त परिस्थितीत आपले लष्कर चिनी सेनेबरोबर सामना करू शकते काय, याचा विचारदेखील विरोधी पक्षाचे नेते करीत नव्हते. पंडित नेहरूंना झोडपायची संधी मिळाली आहे ना ? मग झोडपा. याचा परिणाम मात्र भलताच झाला. पंडित नेहरूंनी ओढून ताणून चंद्रबळ आणले आणि विरोधी पक्षाला निःसंदिग्ध आश्वासन दिले की 'उगाच माझ्या सरकारवर आरोप करू नका. मी भारतीय सैन्याला हुकूम दिला आहे की, भारताच्या हद्दीत घुसलेल्या चिन्यांना हुसकून द्या.' १९६२ साली चीनबरोबर झालेल्या लढाईची जबाबदारी विरोधी पक्षाच्या नेत्यांवरदेखील अप्रत्यक्षरीत्या येते ती ही अशी. पंडित नेहरूंना झोडपायची ती वेळ नव्हती. चीनबरोबर लढाई करण्याची आपली काय तयारी आहे, याचा बारकाईने अभ्यास करून विरोधी पक्षांनीदेखील पंडित नेहरूंना सल्ला द्यायला हवा होता की, 'चीनबरोबर तडजोड करा. प्राप्त परिस्थितीत चीनबरोबर लढणं हे आपलं काम नव्हे.' पण विरोधी पक्षांनादेखील धास्ती ही की आपण जर चीनबरोबर तडजोडीची भाषा बोललो तर आपण राष्ट्रद्रोही ठरू. भारतीय जनता आगामी निवडणुकीत आपला पक्षच नाहीसा करून टाकील. आज कुठे लोकसभेत ३०–४० 'सीटस्' मिळाल्या आहेत त्याही जायच्या. त्याचा परिणाम असा झाला

की, सर्वसामान्य भारतीय माणूस, विरोधी पक्षांचे नेते, सरकार आणि पंतप्रधान नेहरू हे सगळे दमदार भाषेत बोलायला लागले–'इंच इंच लढवू,' 'चिन्यांना हुसका.' हे बोलणारा एकही माणूस सैन्यातला अधिकारी नव्हता. कारण त्यांना खरी परिस्थिती ठाऊक होती. 'ही चिनी इमारत पेटवा' अशी नुसती आरोळी ठोकून ती इमारत पेटेल ? त्यासाठी खिशात काडेपेटी, हातात पेट्रोलचा डबा, कापसाचे बोळे आणि चिनी पोलिसांना चुकवून इमारतीपर्यंत कसे पोचायचे याची अक्कल नको ? नुसताच 'पेटवा ! लढवा ! हुसकवा !' हा आक्रोश काय कामाचा ?

भारताच्या भवितव्यासाठी कणखर भूमिका स्वीकारणे आपल्याला कितपत जमेल, या चिंतेने पंडित नेहरूंना घेरलेले असतानाच तिकडे चीनने मात्र प्रत्यक्षात धमाल चालवली होती. सरहद्दीवर पुन्हा पुन्हा प्रक्षोभक प्रकार करून भारतावर 'आक्रमण' केल्याचा देखावा चीन मुद्दाम करीत होता. आपली ताकद तरी काय आहे, भूमिका काय आहे, हे अजमावण्यासाठी. प्रत्येक आंतरराष्ट्रीय सभेत किंवा मेळाव्यात, जिथे जिथे चीनचा प्रतिनिधी हजर असे तिथे प्रत्येक वेळी तो ठणकावून सांगत असे की, "चीन–भारत यांच्या सीमा प्रश्नाबाबत भारताची बाजू काय आहे ते आम्हांला बघायचं कारणच नाही. त्या बाजूचा विचारदेखील करण्याची आवश्यकता चीनला वाटत नाही. कारण सरहद्दीवर हक्क सांगण्याचा पुरावा म्हणून भारत सरकारकडं जी कागदपत्रं आहेत त्यांचं स्वरूप फिरत्या प्रवाशांनी पुरातन काळी लिहून ठेवलेली 'प्रवास–वर्णनं' या दर्जाचं आहे. तो पुरावा होऊ शकत नाही. बाकीची भारताकडं असलेली कागदपत्रं ही भारत सरकारला साम्राज्यवादी, आक्रमक ब्रिटनकडून वारसा हक्काने मिळालेली आहेत. ती पाहण्याचीदेखील चीनला आवश्यकता वाटत नाही. ब्रिटिश–इंडिया आणि तिबेट यांच्यांत झालेले आन्तरराष्ट्रीय करार चीनवर बंधनकारक असूच शकत नाहीत; कारण ते करार त्या वेळी अधिक सामर्थ्यसंपन्न असलेल्या ब्रिटिश सरकारने दुबळ्या आणि गरीब बिचाऱ्या तिबेटवर अन्याय करून, त्याला धाकदपटशा दाखवून करून घेतलेले आहेत. भारत आणि चीन यांच्या सीमारेषा आम्ही सांगू तशा (!) पुन्हा एकदा निश्चित ठरवून घ्यायला हव्यात !"

चीन या हीन प्रचारात यशस्वी ठरला. आशिया खंडातले ब्रिटिशांचे युग चिन्यांनी अशा तऱ्हेचा हेका धरून संपवीत आणले ! चिनी हे इतिहासदेखील स्तब्ध करू शकले.

सुरुवातीला चिन्यांचे मुख्य लक्ष होते ते भारत–तिबेट सरहद्दीवरच्या लडाख या प्रदेशावर. कारण अक्साई–चीन आणि लडाख या प्रदेशांतून सिक्यांगपर्यंत चीनने हाय–वे बांधून काढला होता. आता लढाख आणि अक्साई–चीन हे भारताचे भू–भाग हे चीनचेच आहेत असे म्हणणे त्यांना भागच होते. १९५७ मध्ये नेफा-

मधील वॉलाँग (Walong) मध्ये चीनने फक्त एकच जोरदार हल्ला केला. कारण त्यांना एवढे समजले होते की अक्साई–चीनच्या पठारावर हक्क सांगायचा तर त्याच्याही अलीकडे भारताच्या हद्दीत असलेल्या ठिकाणावर हल्ला केलाच पाहिजे.

...आणि काय विचित्रपणा आहे पाहा ! सरहद्दीवर चीन हे चाळे करीत असतानाच चीनच्या हवाई आणि नाविक दलातले उच्च सेनानींचे एक शिष्टमंडळ त्या वेळेला भारताला भेट देत होते. या चिनी सेनानी शिष्टमंडळात अनेक चिनी मार्शल्स आणि जनरल्स होते. भारतीय सेनेतल्या अधिकाऱ्यांना आश्चर्य वाटले, धक्का बसला, पाचावर धारण बसली. का ? त्या चिनी सैन्याधिकाऱ्यांना पाहून ते घाबरले म्हणून नव्हे ! असे कित्येक जनरल्स आणि मार्शल्स पाहिलेत आम्ही. आश्चर्यचकित एवढ्याचमुळे झालो, की भारत सरकारचा आम्हा भारतीय सैन्याधिकाऱ्यांना असा हुकूम होता, की आपले सर्व महत्त्वाचे लष्करी उत्पादन करणारे कारखाने आणि अड्डे त्यांना दाखवा. ( " Show Them Everything ! " ) काय म्हणायचं या मूर्खपणाला ? प्रत्यक्ष शत्रू सैन्यातले अधिकारी भारतास येऊन ' सर्व काही ' (Everything) पाहून गेलेले.

१९५९ हे वर्ष भारत–चीन संबंधांना कायमचा तडा घालणारे ठरले. " ' सर्व काही पाहून गेलेल्या (! ) चिनी मार्शल्स आणि जनरल्सनी वर चाऊ–एन–लायला बातमी दिली की, ' चिन्यांना हुसकवा ! ' असा जो दम पंडित नेहरू देत आहेत त्यात काही अर्थ नाही. भारताची लष्करी तयारी चीनच्या लष्करी तयारीच्या एकदशांशदेखील नाही. आम्ही पाहून आलो आहोत ना ' सर्व काही ! ' आणि मग मात्र चीनचे पंतप्रधान चाऊ–एन–लाय यांनी चिनी सेनेला हुकूम दिला की, ' आता विलंब करण्यात अर्थ नाही. आता धरसोड वृत्ती नको. भारत सरकारच्या बढाया, फुशारकी आणि दुटप्पी बोलणे यांवर विसंबून राहू नका. माझ्या शूर चिनी सेनाधिकाऱ्यांनो ! भारतावर आताच आक्रमण करा. पण एकदम भारतात घुसू नका. प्रथम तिबेटमध्ये चीनविरोधी म्हणून ज्या शक्ती आहेत त्यांचा पुरा पुरा बीमोड करून टाका आणि मग भारतीय हद्दीत घुसा ! "

चिनी पंतप्रधानांचा हुकूम व्हायचीच खोटी. राक्षसी चिनी फौजा तिबेटमधल्या चीनविरोधी शक्तींचा नायनाट करून टाकण्यासाठी तिबेटमध्ये घुसल्या. पुढचा नंबर आपला होता. काय केले त्या वेळी चिनी फौजांनी तिबेटमध्ये ?.

(क्रमशः)

**By arrangement with THACKER & CO. LTD.
from their forthcoming publication,
" HIMALAYAN BLUNDER " by Brig. J. P. Dalvi.**
**© with the original publisher.**




ह. वि. दात्ये



‘गायनी कळा’ हा संगीतावरचा ग्रंथ इतर ग्रंथांहून वेगळा आहे. संगीतावरचे लिखाण म्हटले की एकतर त्यात संगीत-रत्नाकर, भरत नाटयशास्त्र, संगीत पारिजात वगैरे संस्कृत ग्रंथांतले उतारे आणि त्यांवरचे विवेचन तरी असते किंवा मग गायक-गायिकांच्या मैफलींचे काव्यमय भाषेतले वर्णन तरी असते. आपली इतर शास्त्रे सर्वार्थाने प्रगत होत असताना संगीत-शास्त्र मात्र अजूनही बाल्यावस्थेतच असावे हे आपले दुर्दैवच म्हणावे लागेल. पण ‘गायनी कळा’ हा ग्रंथ पाहिला की, संगीतशास्त्राची बाल्यावस्था संपत आली असावी, असा दिलासा मिळतो. संगीतशास्त्र म्हणजे केवळ भरतमुनींच्या वचनांची रूक्ष चर्चा नव्हे, मुनींचा न संपणारा वाद नव्हे, हे पटू लागते ते अशा ग्रंथांमुळेच.

हरी विनायक दात्ये यांनी हा ग्रंथ लिहिताना अत्यंत शास्त्रशुद्ध दृष्टिकोण ठेवलेला आहे. त्याचबरोबर काही नवे पारिभाषिक शब्दही रूढ करण्याचा त्यांनी

प्रयत्न केलेला आहे. त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे परिभाषा, स्वरलिपी, प्रांगणीय संगीत, वाद्यविवरण आणि त्यांची 'प्रमाणीतता' ही या ग्रंथाची वैशिष्टये म्हणता येतील.

या ग्रंथातील एकूण सोळा प्रकरणांत दात्यांनी नाद, संवादभाव, स्वरकुल, स्वराक्षरे वगैरे प्राथमिक माहितीपासून प्रारंभ करून वाद्यांची काळजी कशी घ्यावी इथपर्यंतची माहिती तपशीलवार दिली आहे. सांघिक गायन आणि वादन हे सुलभ व्हावे म्हणून आपल्या संगीतातले स्वरलेखन हे शास्त्रशुद्ध व्हावे व त्यात प्रमाणीतता यावी हा त्यांचा मुख्य हेतू असल्यामुळे त्यांनी स्वरलेखनावर विस्ताराने लिहिले आहे. पं. भातखंडे, पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांची स्वरलिपी आणि पाश्चात्यांची स्टाफ नोटेशनची पद्धती यांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांनी जी नवी स्वरलिपी बनवली आहे त्या स्वरलिपीत अनेक नव्या आणि चांगल्या गोष्टी त्यांनी आणल्या आहेत. अर्थात भारतीय संगीत हे पूर्णांशाने स्वरलिपिबद्ध करणे अशक्य आहे ही गोष्ट त्यांच्या पूर्णपणे ध्यानात आहे. पण प्रांगणीय आणि सांघिक गायन-वादन हाच उद्देश त्यांच्या डोळ्यांसमोर असल्यामुळे ही स्वरलिपी त्या उद्देशाला पूरकच ठरेल. सांघिक गायन आणि वादन करायला अत्यंत उपयुक्त ठरेल. काही अंशी ही स्वरलिपी शास्त्रीय गायनातल्या चीजा व सुगम संगीतातील गीते स्वरलिपिबद्ध करायलाही अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. स्वरलिपी ही कोणालाही लिहिता वाचता यावी, त्यांतील चिन्हांचा अर्थ व संकेत यांना निश्चित अर्थ असावा, मुद्रणालाही ती सुलभ असावी, आणि याशिवाय तिचे लेखन हे सुंदरही दिसावे या सर्व अपेक्षा दात्यांच्या या नव्या स्वरलिपीत पूर्ण होतात. विकृत स्वरांसाठी त्यांनी वापरलेले चिन्ह, स्वरांबरोबरच त्यांच्या मात्राही दाखविण्यासाठी त्यांनी वापरलेली 'मातृका,' 'छेदक', 'छेदिका' ही चिन्हे, नादरहित कालमानासाठी त्यांनी वापरलेले 'यती' हे चिन्ह, अवग्रह चिन्हांचा विशेष केलेला उपयोग ही या नव्या स्वरलिपीची वैशिष्टये म्हणता येतील.

भारतीय संगीतातले अद्वितीय वैशिष्टच म्हणजे तालशास्त्र. जगातल्या कोणत्याही संगीतात, तालशास्त्रावर इतका सूक्ष्म आणि सर्वंकष विचार झालेला दिसून येत नाही. त्यामुळे दात्यांनी आपल्या ग्रंथात तालाच्या विवरणासाठी परिश्रमपूर्वक लेखन केले आहे. हे विवरण करताना 'सम' व 'काल' या रूढ शब्दांऐवजी त्यांनी वापरलेल्या 'वादी मात्रा' व 'संवादी मात्रा' या संज्ञा जास्त समर्पक वाटतात.

वाद्यविवरण या प्रकरणात लेखकाने अनेक प्रकारच्या वाद्यांची माहिती छायाचित्रांसह दिली आहे. काही वाद्यांची रूढ नावे न देता त्यांना काही नवी नावे दिली आहेत. या नव्या नावांचा वापर करताना कंसांत त्यांची रूढ नावेही दिली असती तर बरे झाले असते. उदाहरणार्थ, नागांग (सॅक्सोफोन), स्वरद (क्लॅरिओनेट),

तूर्यशृंग (ट्रंपेट), प्रतानप्रतूर्य (ट्रंबोन) वगैरे. यामुळे या नव्या संज्ञा रूढ होण्यास मदत झाली असती. या मूळ संज्ञा छायाचित्रात देणे अती आवश्यक होते.

सांघिक गायन कसे करावे याचा सविस्तर ऊहापोह पंधराव्या प्रकरणात केला आहे. गायकांनी कसे उभे राहावे, त्यांची मनःस्थिती कशी असावी, त्यांनी कोणते नियम पाळावेत, वाद्ये कोणती वापरावीत, गायकांच्या तोंडाची हालचाल कशी असावी, या सर्व गोष्टींचा सूक्ष्म विचार करून त्यांसंबंधीच्या अत्यंत उपयुक्त सूचना दिलेल्या आहेत. सांघिक गायन–वादनाच्या दृष्टीने या सूचना मार्गदर्शक व मौलिक आहेत.

काही विधानांचा खुलासा केला असता तर बरे झाले असते. उदाहरणार्थ, पृष्ठ १८ वर श्रुतींविषयी त्यांनी जे विधान केले आहे, त्यामुळे सर्व श्रुती समान असाव्यात असा समज होतो. असे जर मानले तर सर्व स्वर प्रचलित स्वरांपेक्षा चढलेले किंवा उतरलेले मिळतील. दोन षड्जांतील अंतर ३०१ सेवर्ट असते. जर सर्व श्रुती समान मानल्या तर प्रत्येक श्रुती $\frac{३०१}{२२}$ = १३·७ सेवर्टची येईल. त्यामुळे


# मंत्रावेगळा

इतिहासप्रेमी वाचकांच्या रसिकतेला आणि
रसिक वाचकाच्या इतिहासप्रेमाला साद घालणारी

## मंत्रावेगळा

'झेप' व 'झुंज' कर्ते **ना. सं. इनामदार**
यांच्या सफाईदार शैलीतून उतरलेली
दुसऱ्या बाजीरावाची शोकांतिका

**किंमत पंधरा रुपये : पृष्ठसंख्या ७१०**

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

चतुःश्रुतिक स्वर १३·७ × ४ = ५४·८ सेवर्ट, त्रिश्रुतिक स्वर १३·७ × ३ = ४१·१ सेवर्ट.

द्वीश्रुतिक स्वर १३·७ × २ = २७·४ सेवर्ट असे स्वर मिळतील. हे स्वर घेऊन आपले सप्तक सिद्ध केले तर त्यांतले काही स्वर चढलेले तर काही स्वर उतरलेले असतील. श्रुती सर्व समान आहेत, असे त्यामुळे मानता येत नाही.

त्याचप्रमाणे 'ऋण' स्वरांबद्दल त्यांनी पृ. १०८ वर जे विधान केले आहे तेही तितकेसे पटणारे नाही. ऋणस्वरांमुळे शोभा येते, पण ते नसले तरी अडत नाही असे दात्ये म्हणतात. ऋणस्वरांमुळेच प्रत्येक राग सिद्ध होतो, हे घरंदाज गवयांचे मत आहे. नुसते स्वर म्हणजे राग नव्हे, तर विशिष्ट ऋणांनी युक्त असे स्वर जेव्हा घेतले जातात तेव्हाच राग सिद्ध होतो, रागरूप स्पष्ट होते.

पण लेखकाचा हेतू मुख्यतः प्रांगणीय व सांघिक संगितावरच विस्ताराने लिहिण्याचा असल्यामुळे वरील काही विधानांवर जास्ती लिहिणे लेखकाला आवश्यक वाटले नसावे. स्वरलेखन व तालांची लिपिबद्धता यांसाठी लेखकाने जे विचार परिश्रमपूर्वक मांडले आहेत त्या विचारांमुळे संगीतशास्त्र पुढे गेले आहे. थोडेसे धाडस करून असेही सांगता येईल की, पं. भातखंडे यांच्यानंतर मराठीत तरी इतका विचारप्रवर्तक ग्रंथ दुसरा झाला नाही.

प्रा. रा. शं. वाळिंबे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना हे या ग्रंथाचे आणखी एक भूषण आहे. त्यात त्यांनी मांडलेले वृंदगायनाविषयीचे विचार मौलिक आहेत. पण पूर्वीचे वृंदगायन आणि आजचे वृंदगायन यांत जमीन–अस्मानाचा फरक पडलेला आहे. त्यामुळे 'रत्नाकरा'ने दिलेले इशारे आता पाळण्याचे काहीच कारण नाही.

चोवीस गायक व आठ वादक ही रत्नाकराच्या मताने उत्तम वृंदाची संख्या. पण आज कमीत कमी चाळीस गायक आणि तितकेच वादक असल्याशिवाय उत्तम वृंद होऊच शकत नाही. त्यांचा 'कोलाहल' तर होत नाहीच पण तो अत्यंत रंजक होतो. या दृष्टीने व्हिक्टर परंज्योती यांनी वृंदगायनाचे जे प्रयोग केले ते मार्गदर्शक ठरावेत.

मराठीत संगीतावर इतका अभ्यासपूर्ण व विचारप्रवर्तक ग्रंथ लिहून संगीतशास्त्राच्या प्रगतीला हातभार लावल्याबद्दल श्री. दात्ये यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. ☐

**– अरविंद गजेंद्रगडकर**

**[गायनी कळा : लेखक, प्रकाशक : हरि विनायक दात्ये : किंमत बारा रुपये : पृष्ठ १८३]**

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ मार्जिनल नोटिंगचा जन्मसिद्ध अधिकार

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या सुप्रसिद्ध विद्यालयाच्या बंडखोर विद्यार्थ्यांनी नुकतेच एक पत्रक छापले आहे. त्यात अशी तक्रार केली आहे की "निबंध-लेखन, अधिक वाचन आणि परीक्षा यांच्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या राजकीय चळवळीवर बंधन पडले आहे." तक्रार अगदी रास्त आहे. 'दिसामाजी काही तरी ते लिहावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे' हा हितोपदेश अक्षरशः शिवकालीन आहे. शिवाय ग्रंथ हे पूर्वी गुरु होते ते आता गुरूं झाल्याने वाचनासारखा वेळेचा अपव्यय नाही. अन् परीक्षेचे म्हणाल तर साडेतीनशे दिवसांत केलेला अभ्यास साडेतीन तासांत कागदावर उतरवून पास व्हायचे म्हणजे स्मरणशक्तीपेक्षा विस्मरणशक्तीचीच कसोटी म्हणायची. तेव्हा विद्येशी ज्याचा अर्थाअर्थी संबंध नाही तो विद्यार्थी ही नवीन व्याख्या लक्षात घेऊन या नव-विद्यार्थ्यांच्या "बहिःशालेय" कार्यक्रमावर अभ्यासाचे जाचक बंधन नसावे ही अपेक्षा धुंडीराजाच्या शब्दांत सांगायचे म्हणजे रास्त आहे, उचित आहे अन् योग्यही आहे.

हिंदुस्थानातले विद्यार्थी या तक्रारीशी संपूर्ण सहमत असतील अशी मला खात्री आहे. खरे म्हणजे हिंदुस्थानातली एकंदर परिस्थिती पाहता इतर अनेक मंडळीही आपल्यावरची अशी अन्याय्य बंधने झुगारून कटिबद्ध झाली असावीत असे दिसते. उदाहरणार्थ, कामगार: "गिरणीत नियमितपणे जाऊन काम करण्याचे बंधन आमच्या संप-स्वातंत्र्याला घातक आहे." कारकून: "मार्जिनल नोटिंग हा आमचा जन्मसिद्ध अधिकार आहे व तो मिळवण्यासाठी आम्ही प्रत्येक फाईल इंच-इंच लढवू." नोकरी करणाऱ्या मुली: "ऑफीसच्या वेळात किती वेळात किती वेळ टाईप करायचे किंवा स्टेटमेंट भरायचे अन् किती वेळ स्वेटर विणायचा याची समविभागणी नाही; ही विषमता आम्ही सहन करणार नाही." अधिकारी: "पैसे खाणे हा आमचा दैनिक आहार आहे. तेव्हा आम्हांला प्रामाणिकतेचे डाएटिंग करायला लावून आमच्या पोटावर पाय आणू नये." हातभट्टीवाला: "सरकारी बिअरने आधीच आमच्या तोंडचा घोट काढला आहे. त्यात कोणीतरी पुणे नगरपालिकेत नुकतेच सुचविल्याप्रमाणे अधिकृत बेवड्याची भर पडली तर आम्हांला एकच परमिट प्याल्यात आमचे दुःख बुडवावे लागेल." जुगारी अड्ड्याचा दादा: "सरकारी लॉटरी म्हणजे जुगाराच्या व्हेरी प्रायव्हेट सेक्टर व्यवसायावर पब्लिक सेक्टरचे अतिक्रमण आहे. आता निदान कुंटणखान्यांचे तरी असेच राष्ट्रीयीकरण करू नये."

○

# कुटुंब नियोजन

# हा

# जनता कार्यक्रम

## राष्ट्रपती

" आपला कुटुंब नियोजन कार्यक्रम जगात हाती घेण्यात आलेल्या अशा कार्यक्रमांपैकी सर्वांत मोठा आहे यात शंका नाही. आपली लोकशाही तत्त्वे व मूल्ये न दवडता आपण हा कार्यक्रम कशा तऱ्हेने अंमलात आणतो याकडे जगाचे डोळे लागून आहेत. आरोग्य कार्यक्रमाच्या यशानंतर, झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रश्नास अनेक विकसनशील राष्ट्रांना तोंड द्यावे लागत आहे किंवा लागणार आहे. अशा राष्ट्रांना आपल्या कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे यश मार्गदर्शक ठरणार आहे. यामुळेच आपणा सर्वांवर अधिक जबाबदारी येऊन पडली आहे," असे उद्‌गार राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांनी अलीकडेच राष्ट्रास उद्देशून आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात काढले होते.

आपल्या भाषणात डॉ. झाकीर हुसेन म्हणाले–

" व्यक्तिशः व भारताचा राष्ट्रपती म्हणून या प्रश्नास मी सर्वांत अधिक महत्त्व देतो. व्यक्ती म्हणून आणि म्हणूनच राष्ट्र म्हणून हा प्रश्न आपणा सर्वांस भेडसावतो.

गेल्या २१ वर्षांत अनेक सामाजिक-आर्थिक क्षेत्रांत आपण पुष्कळच प्रगती व विकास साध्य केला आहे. आपण शेतकी उत्पादन वाढविले आहे आणि कृषी क्षेत्रातील कोंडी फोडण्यातही खचितच यश मिळविले आहे. औद्योगिक उत्पादन वाढले आहे आणि अनेक पटींनी शैक्षणिक सोयींतही वाढ झाली आहे. प्राथमिक आरोग्य-सेवांच्या विकासामुळे आणि कॉलरा, देवी व मलेरियांसारख्या संसर्गजन्य रोगांना आळा घालण्यात आपण मिळविलेल्या यशामुळे मृत्यूचे प्रमाणही नाटयपूर्णरीत्या खाली आले आहे. चांगल्या प्रकारच्या वैद्यकीय उपचारांमुळे, १९४७ साली असलेली संभाव्य सरासरी आयुर्मर्यादा २७ वरून आज ५० वर्षांवर गेली आहे. मात्र यात्र कालावधीत जनन प्रमाणात फारच थोडी घट झाली.

याचाच परिणाम म्हणून आज आपणांस भरमसाट लोकसंख्यावाढीच्या प्रश्नास तोंड द्यावे लागत आहे. १९४७ मध्ये आपली लोकसंख्या ३४·४ कोटी होती ती आज ५२·८ कोटींवर गेली आहे. या प्रचंड संख्यावाढीमुळे विविध क्षेत्रांतील प्रगतीचे लाभ पुरेसे पडत नाहीत व परिणामतः राहणीमान उंचावण्याच्या आपल्या प्रयत्नांत अडथळा येतो. म्हणूनच मृत्यूचे प्रमाण आणखी खाली आणण्याच्या प्रयत्नांबरोबर जनन प्रमाणात पुष्कळ घट घडवून आणण्याचे प्रयत्नही करणे जरुरीचे आहे. हे आपण करू शकलो नाही तर येत्या तीस वर्षांत आपली लोकसंख्या दुप्पट होऊन १०० कोटींवर जाईल आणि समुद्राच्या लाटांबरोबर वाळूत काढलेली अक्षरे जशी पुसून जातात तसे आपल्या सर्व विकास प्रयत्नांचे होईल.

परंतु निराश होण्याचे कारण नाही. गेल्या तीन वर्षांतील आपल्या प्रयत्नांमुळे देशात लोकसंख्येच्या प्रश्नाबाबत प्रचंड जागृती झाली आहे, हे सांगताना मला आनंद वाटतो. देशाच्या विविध भागांत हाती घेण्यात आलेल्या अभ्यासावरून दिसून आले आहे की, बहुसंख्य लोक कुटुंब नियोजनाच्या गरजेबाबत जागरूक झाले आहेत आणि दोन व तीन मुले असलेल्या छोटया कुटुंबांचा संकेत अधिक प्रमाणावर मान्यता पावू लागला आहे.

देशातील ९ कोटी संततिक्षम जोडप्यांपैकी ११ टक्के जोडपी छोटया व सुखी कुटुंबासाठी कुटुंब नियोजनाच्या या ना त्या पद्धतींचा वापर करीत आहेत. हे यश उल्लेखनीय आहे. ही सामाजिक क्रांती घडवून आणण्यात या क्षेत्रातील ज्या हजारो कर्मचाऱ्यांनी उत्साहपूर्वक प्रयत्नांनी प्रचंड कार्य करून दाखविले त्यांचा मला अभिमान वाटतो.

तीन वर्षांपूर्वी आम्ही हा कार्यक्रम व्यापक प्रमाणावर हाती घेतला, तेव्हा त्याच्या यशस्वितेबद्दल आमच्यापैकी अनेकांच्या मनात शंका होती; परंतु आज या क्षेत्रात क्रांती घडत असल्याचे दृश्य दिसते. या कार्यक्रमाला मिळालेली गती या क्षेत्रात स्थित्यंतर घडवून आणील, याची मला खात्री वाटते.

या प्रसंगी मला एक इशारा द्यावासा वाटतो. गेल्या तीन वर्षांत आपण या

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत वेगाने प्रगती केली असली तरी आपल्याला अजून बरीच वाटचाल करावयाची आहे व तोपर्यंत आपल्या प्रयत्नांत शिथिलता येऊ देता कामा नये. आपले विकास प्रयत्न अर्थपूर्ण ठरावेत या दृष्टीने, म्हणजे आपल्या श्रमांची फळे आपल्यापैकी प्रत्येकाला पुरेशा प्रमाणात चाखावयास मिळण्याच्या दृष्टीने प्रत्येक दांपत्याने दोन किंवा तीन मुलांपेक्षा अधिक मुले नकोत, असा निर्णय घेतला पाहिजे. ज्यांना तीन मुले असतील त्यांनी अधिक मुले नकोत, असा निर्णय घेतला पाहिजे.


मातेचे आरोग्य चांगले राहावे व मुलांचे योग्य संगोपन व्हावे या दृष्टीनेही होणारी २–३ मुले ठराविक अंतराने झाली पाहिजेत. ९ कोटी दांपत्यांपैकी प्रत्येक दांपत्यामार्फत हा संदेश आम्ही पोहोचविला पाहिजे व त्यांना छोटया कुटुंबांचा संकेत मान्य करण्यासाठीच नव्हे, तर तो कृतीत उतरविण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे, तरच आपले विकास प्रयत्न फलदायी ठरतील.

हे आव्हान देणारे कार्य आहे. केवळ सरकारी प्रयत्नांनी ते यशस्वी होणार नाही. लाखो दांपत्यांच्या निर्णयावर व कृतीवर त्याचे यश अवलंबून आहे. म्हणूनच हा कार्यक्रम जनता कार्यक्रम बनला पाहिजे. इतरांच्या विचारांवर प्रभाव पाडू शकणाऱ्या व्यक्तींवर या दृष्टीने विशेष जबाबदारी येऊन पडते. विचारपरिवर्तन घडवून आणणाऱ्या सर्वच क्षेत्रांतील पुढाऱ्यांनी या कार्यक्रमात सक्रिय भाग घेतला पाहिजे, असे मला सुचवायचे आहे. छोटया सुखी कुटुंबाच्या संदेशाचा प्रसार करून कठीण प्रश्नावर मात करण्यासाठी राष्ट्रास ते मदत करू शकतात.

आपल्या देशात या कार्यक्रमास समाजातील वर्गांकडून पाठिंबा व मान्यता मिळाली आहे, ही भाग्याची बाब आहे. धर्म, समाजातील स्थान व राजकीय मतप्रणाली त्या आड येऊ नयेत हे ठीकच आहे; कारण प्रत्येक कुटुंबास सर्वप्रथम लाभदायक ठरणारा हा कल्याणकारी कार्यक्रम आहे.

आपला हा कार्यक्रम जगातील अशा प्रकारच्या कार्यक्रमांतील सर्वांत मोठा कार्यक्रम आहे, यात शंका नाही. आपली लोकशाही तत्त्वे व मूल्ये न दवडता आणि हा कार्यक्रम कशा तऱ्हेने अंमलात आणतो याकडे जगाचे डोळे लागून आहेत. आरोग्य कार्यक्रमाच्या यशानंतर झपाटयाने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रश्नास अनेक विकसनशील राष्ट्रांना तोंड द्यावे लागत आहे किंवा लागणार आहे. अशा राष्ट्रांना आपल्या कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे यश मार्गदर्शक ठरणार आहे. यामुळेच आपणा सर्वांवर अधिक जबाबदारी येऊन पडली आहे. म्हणूनच कुटुंब नियोजन पंधरवडयाच्या प्रारंभी मी सर्व देशबांधवांस हा कल्याणकारी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचे आवाहन करतो. अशा प्रयत्नांतूनच आपला भविष्यकाळ अधिक निरोगी, सुखी व बलवान होऊ शकेल.

◻



छोटया छोटया खेळण्यातूनही कुटुंबनियोजनाचा प्रचार

# एक आदर्श खेडे

जळगाव जिल्ह्यातील कुवार खेडे हे गाव म्हणजे एक आदर्श खेडे आहे. या गावातील सर्वांनीच कुटुंब नियोजनाचा स्वीकार केला आहे. या गावाची कथा मोठी उद्बोधक आहे.

या गावाने सर्वांनी मिळून कुटुंब नियोजन स्वीकार करण्याचा निर्णय केव्हा घेतला हे नेमके सांगता येणार नाही; परंतु ही कल्पना रुजविली ती एका क्षेत्रीय कार्यकर्तीने. श्रीमती लीला वाणी या जवळच्या कानल्दे गावात राहत होत्या आणि कुवार खेडेगावाला प्रचारासाठी त्या नेहमी येत. त्यांच्या प्रचाराला तावडतोब असा प्रतिसाद मिळाला नाही तरी ही कल्पना गावकऱ्यांच्या मनात रुजली असे दिसते.

एक दिवस सहा-सात गावकरी, गावातील सर्वांत अधिक शिकलेले व म्हणून

सल्लागार मानले गेलेले गावचे प्राथमिक शिक्षक श्री. यशवंत तानाजी पाटील यांच्याकडे आले. आपले कुटुंब सुटसुटीत असावे हा विचार सर्वांना पटला होता. कुटुंबाचे पालनकर्ते म्हणून आपली जबाबदारी त्यांना पार पाडायची होती. आणखी मुले होऊन आपला बोजा वाढू नये आणि असलेल्या मुलांचे संगोपन नीट करता यावे ही त्यांची उत्कट इच्छा होती; परंतु ते करावे कसे याबद्दल सुज्ञ माणसांचा सल्ला त्यांना हवा होता.

सात-आठ जणांच्या या बैठकीत संततिप्रतिबंधक साधनांची चर्चा झाली. कायम संतती थांबविण्याचा एखादा कायमचा उपाय सर्वांना हवा होता. परंतु स्त्रियांची शस्त्रक्रिया म्हणजे त्यांना दुसऱ्या गावी नेणे आले. शस्त्रक्रियेनंतर त्यांचे आठ-दहा दिवस तेथे राहणे आले. त्यापेक्षा पुरुषांनीच पुढाकार घ्यावा याबद्दल मंडळींचे एकमत झाले. परंतु नसबंदी शस्त्रक्रियेबद्दल त्यांच्या मनात भीती होती, शंका-कुशंका होत्या.

यशवंत पाटलांनी त्या शंका दूर करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याहीपुढे जाऊन स्वतःच्या उदाहरणाने त्या लोकांचे मन तयार करण्याचा निश्चय त्यांनी केला. त्यांनी स्वतः शस्त्रक्रिया केली तर इतर गावकरी मागे राहणार नाहीत, अशी हमी इतरांनी भरली आणि मग ही सारी मंडळी सरपंचांकडे गेली.

पुढले काम सोपे होते. निरोप पोहोचताच जिल्हा आरोग्याधिकाऱ्यांनी गावात नसबंदी शिबिर आयोजित केले. पहिली नसबंदीची शस्त्रक्रिया यशवंत पाटील यांनी दिनांक १४ जानेवारी १९६७ रोजी केली. यशवंत पाटलांना दोन मुली व एक मुलगा होता. त्यांची बायको सुशिक्षित होती. तिनेही आपल्या यजमानांना प्रोत्साहन दिले. शस्त्रक्रियेनंतर यशवंत पाटलांची प्रकृती चांगलीच सुधारली. त्यांच्या वैवाहिक सुखात कोणताच अडथळा आला नाही आणि जीवन अधिक सुखी झाले. लोकांच्या शंकाकुशंका दूर झाल्या.

परंतु तत्पूर्वीच काही लोकांनी आपल्या मनाची तयारी केली होती. नंतर भरलेल्या एकाच शिबिरात त्रेचाळीस गावकऱ्यांनी नसबंदी करून टाकली. आणि जननक्षम् गटातील जास्त मुले असलेली दहा जोडपी फक्त गावात उरली. गावाचे सरपंच मुकुंदराव मानाजी पाटील हे त्यांपैकी एक होते. त्यांनाही दोन मुली व एक मुलगा होता. बायकोला चौथेपणी दिवस गेले होते. गावातल्या या लोकांची शस्त्रक्रियेला तयारी होती.

तेवढ्यात गावात एक दुर्घटना घडली. मनसाराम पोपट पाटील या नसबंदी केलेल्या गावकऱ्याच्या दोनपैकी एक मुलगा वारला. आता त्याचा गावकऱ्यांवर परिणाम होईल, अशी धास्ती निर्माण झाली. परंतु खुद्द मनसाराम पुढे आले. आपले मन ताब्यात ठेवून कुटुंब नियोजन सुखी संसारासाठी कसे आवश्यक आहे ते त्यांनी गावकऱ्यांना समक्ष सांगितले आणि दिनांक २१ डिसेंबर १९६७ रोजी शेवटचे

शिबिर भरले. गावातील दहा आणि इतरांची तीन अशा तेरांची शस्त्रक्रिया झाली. सरपंचही त्यात होते. सर्वांनी नियोजनाचा स्वीकार केलेले खेडे हे गावचे वैशिष्ट्य कायम ठेवण्याचा निर्धार गावकऱ्यांच्या वतीने त्यांनी व्यक्त केला.


संपूर्ण गावाने शस्त्रक्रिया करून घेण्याच्या या उपक्रमाला आणखी एक आदर्श बाजू आहे. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेला उद्युक्त केल्याबद्दल गावकऱ्यांना एकूण ५३० रु. मिळाले. सर्वांनी हे पैसे गावाला दिले. त्यातून गावातील ५० मुलांना डांग्या खोकला, घटसर्प व धनुर्वात या रोगांना प्रतिबंधक अशी इंजेक्शने देण्यात आली आणि उर्वरित रकमेतून शाळेची एक खोली बांधण्यात आली.

त्यानंतर आठ-दहा महिने लोटले. गावात बळवंत सिताराम चव्हाण म्हणून नवीन शिक्षक आले. त्यांना तीन मुलगे होते. शस्त्रक्रिया करण्यास योग्य असे आणखी दोन गावकरी होते. गावाचे संपूर्ण संततिनियमन हे वैशिष्ट्य ठेवण्यासाठी त्यांनी शस्त्रक्रिया करून घेण्याची तयारी दाखविली.

संपूर्ण कुटुंब नियोजन केलेले खेडे म्हणून या वर्षी ३ हजार रु. चे पारितोषिक आपल्याला मिळेल, अशी कुवारखेडकरांची अपेक्षा आहे. या रकमेतून बारमाही पाण्याची मोठी विहीर खणण्याचे गावकऱ्यांनी ठरविले आहे.

गावातील प्रत्येक कुटुंबाचे नि संपूर्ण गावाचे हित साधणारे कुवार खेडे हे खरोखरच आदर्श खेडे आहे.

○



दुसऱ्या महायुद्धात, उभय पक्षांच्या युद्धयंत्रणेत हेरखात्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. या हेरांनी प्रसंगी आपल्या प्राणांचे मोल देऊन लढाईचे पारडे फिरवलेले आढळते. त्यामुळे प्रत्येक पक्षाने हेरशोधनाची खास व्यवस्था केली होती. गुप्तता हा हेरगिरीचा प्राण असल्याने हेरगिरी शाबीत करणे मोठे दुष्कर होई. संशयित हेरांची उलटतपासणी घेण्यासाठी कसलेल्या अधिकाऱ्यांची योजना केलेली असे. कर्नल ऑरेस्टे पिंटो या दोस्तांकडील अधिकाऱ्याचे हेच काम होते. आपल्या कामाचे कर्नल पिंटोने शास्त्रच बनवले होते. शिवाय जोडीला त्याची विलक्षण कल्पनाशक्ती होतीच. त्यामुळे आपल्या कारकीर्दीत अनेक जर्मन हेरांचा रहस्यभेद त्याने केला. त्याबद्दल खुद्द जनरल आयसेनहॉवरने त्याचा मुक्तकंठाने गौरव केला होता. युद्धसमाप्तीनंतर या 'हेरपकडचा' कर्नल ऑरेस्टे पिंटोने आपले अनुभव कथन करणारी चार पुस्तके (Spy-Catcher) लिहिली. प्रस्तुत कथा त्यांतील एका कथेचा अनुवाद आहे.

एकोणीसशे चव्वेचाळीस सालच्या सप्टेंबर महिन्यात, फिल्ड मार्शल मॉंटगोमेरी यांनी जर्मनीवर मर्माघात करण्याची आखलेली एक धाडसी योजना अयशस्वी झाली. या योजनेप्रमाणे, हवाईदलाच्या मदतीने मॉंटगोमेरी हॉलंडमध्ये छत्रीधारी सैनिक उतरवणार होते; या सैनिकांनी हॉलंडमधील पूल काबीज करून त्या मार्गाने पुढे सरकणाऱ्या मॉंटगोमेरीच्या यंत्रसज्ज पायदळाचा मार्ग निर्वेध करायचा होता, परंतु दुर्दैवाने हॉलंडमध्ये हवाईमार्गे उतरलेल्या तुकड्यांमध्ये नको तेवढे अंतर पडले. दहा दिवसांच्या घनघोर लढाईत जर्मनांनी त्यांना यथेच्छ चोप दिला. सगळ्या मोहिमेवरच अखेर पाणी सोडावे लागले.

# हेरांची दुक्कल

अनंत भावे

## १

ही मोहीम फसल्यावर एकंदर युद्धाची गती एकदम थंडावली आणि लगोलग आलेल्या हिवाळ्याने तर दोस्तांच्या आगेकुचीला चांगलाच पायबंद बसला. जोपर्यंत दोस्तांचे सैन्य नाट्यपूर्ण रीतीने वेगाने पुढे सरकत होते, तोपर्यंत हॉलंडमधील जनतेला फक्त काही काळ जागच्या जागी स्थिर राहून वाट पाहावी लागणार होती; परंतु दोस्तांची आगेकूच थांबल्यावर, जर्मनांच्या पिछाडीला पडलेल्या डच देशभक्तांना दोस्तांशी हातमिळवणी करण्यासाठी स्वतःच पुढाकार घेणे आवश्यक होऊन बसले. तसा यशस्वी प्रयत्न अनेकांनी केलादेखील. कधी कधी एका दिवसात साठ-सत्तर देशभक्त जर्मनांना हुलकावणी देऊन, विरोधी आघाड्यांमधील अंतर

पार करून दोस्तांच्या आघाडीशी येऊन पोहोचत असत. या भाग्यवंतांना तावडतोब डच प्रतिहेरखात्याच्या मध्यवर्ती कार्यालयात उलटतपासणीसाठी आणण्यात येई. हे कार्यालय आर्नहेमपासून नैर्ऋत्येला पन्नास मैलांवर आईंडहॉवेन येथे होते. मी– कर्नल ऑरेस्टे पिंटो– या कार्यालयाचा प्रमुख होतो.

## स्वागताचा वेगळा प्रकार

कार्यालयात आल्यावर जरूर असेल त्यांना गरम गरम जेवण देण्यात येई. मग त्यांची कसून झडती घेतल्यानंतर त्यांना उलट तपासणीला तोंड द्यावे लागे. या साऱ्या प्रकाराचा अनेकांना संताप येई. आपण एवढा मोलाचा जीव धोक्यात घालून, केवळ देशाभिमानाने प्रेरीत होऊन मित्रांच्या आश्रयाला आलो आणि तेथे पाहावे तर सारा अविश्वासाचा कारभार असे वाटून त्यांच्या मानी मनाला खेद होई. मग मला त्यांची समजूत काढावी लागे. अनेक ठिकाणी मिळणारी माहिती गोळा करून एक विशाल, परिपूर्ण चित्र आमच्या गुप्तहेरखात्याला कसे करावे लागते याची काही कल्पना मी त्यांना देई. त्यांच्यापैकी एखाद्याजवळ एखाद्या जर्मन तुकडीबद्दल किंवा त्यांच्या एखाद्या प्रतिकारयोजनेबद्दल अल्पमात्र माहिती असण्याची शक्यता असे. त्याच्या दृष्टीने त्या माहितीला कसलेच महत्त्व असण्याचे कारण नव्हते. त्यामुळे आपण होऊन ती माहिती सांगण्याचे त्याला कसे सुचणार! पण आम्ही मात्र असे माहितीचे कण गोळा करून, ते जोडून एक सुस्पष्ट रेखीव चित्र उभे करीत असल्यामुळे आम्हांला मात्र ती अल्प माहितीही फार उपयोगी ठरण्याचा संभव असे.

त्याशिवाय जर्मन गुप्तहेरखात्याचाही विचार करणे जरुरीचे होते. युद्धाच्या त्या अवस्थेतदेखील जर्मन गुप्तहेरखाते चांगले कार्यक्षम होते. रोजच्या रोज दोस्तांशी हातमिळवणी करायला येणाऱ्या देशभक्तांमध्ये आपले काही हेर छपवून पाठवण्याची ही सुवर्णसंधी जर्मन गुप्तहेरखाते डावलणे शक्यच नव्हते. युद्धाच्या सुरुवातीपासून त्यांनी असे प्रयत्न सातत्याने केले होते.

हातमिळवणी करण्यासाठी आलेल्या माणसाची झडती घेणे हे काम फारसे अवघड नव्हते. रात्रीच्या वेळी शत्रूची नजर चुकवून येणारा माणूस भलेमोठे ओझे कशाला वागवणार? शिवाय चार वर्षांच्या पारतंत्र्यात ज्या डच देशभक्ताने जे त्यांची कधीही हांजी हांजी केली नाही त्याच्याजवळ स्वतःचे सामान तरी कितीसे उरणार?

हे लक्षात घेऊन आम्ही झडतीची व्यवस्था पुढीलप्रमाणे केली होती : एका लॉरी-मधून या माणसांची तुकडी कार्यालयात येई. माझ्या मदतीला फक्त एक विश्वासू सहकारी होता. आम्हा दोघांपैकी एकजण त्यांच्या स्नानाची आणि जेवणाची व्यवस्था करण्यात गुंतला असताना दुसरा त्यांच्या नावांची यादी करी आणि पत्ते लिहून घेई. त्यानंतर त्यांना त्यांचे खिसे मोकळे करावे लागत. प्रत्येकाच्या सामा-



**बाखवीस फिलंट हे माझं नाव, साहेब**

नाची यादी करून ते एका पिशवीत टाकण्यात येई. त्या पिशवीवर त्याचे नाव घालण्यात येई. सामानाबद्दल रीतसर पावती देण्याची पद्धती होती. त्यानंतर ते विश्रांती घेत असताना या पिशव्या कार्यालयातील एखाद्या खोलीत नेण्यात येत आणि ते सामान टेबलावर ओतण्यात येई. या खोलीत प्रत्येकाच्या सामानाची बारीक तपासणी होई. प्रसंगी सूक्ष्मदर्शकाचाही उपयोग करण्यात येई.

अभ्यागतांच्या पुस्तकांची बारकाईने पाहणी करावी लागे. पुस्तकातील काही विशिष्ट अक्षरांच्या खाली टाचणीने भोके पाडून एखादा पत्ता, नाव व सांकेतिक माहिती जुळवण्यात येण्याचा संभव असे. पुस्तकाच्या प्रचंड विस्तारात त्याचा शोध करणे मोठे बिकट होऊन बसे. फाऊंटनपेनच्या नळचांमध्ये शाईच असून एखादा छुपा कॅमेरा दडलेला नाही याची खात्री करून घ्यावी लागे. या पद्धतीने केलेला सामानाचा शोध कधीही फुकट जात नाही, असा माझा या क्षेत्रातील प्रदीर्घ कारकीर्दीचा अनुभव होता. माणूस जवळ बाळगत असलेल्या वस्तूंवरून त्याच्याबद्दल कितीतरी माहिती सहज कळू शकते आपल्याला. कधीकधी तर त्याच्यापाशी अपेक्षित वस्तू नाहीत यावरूनदेखील काही अंदाज लागू शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या संशयित माणसाची बोटे निकोटाईनने डागळलेली आहेत आणि त्याच्या सामानात मात्र आगपेटी नाही वा सिगारेटचे पाकीटदेखील नाही; अशा वेळी या विसंगतीचे कारण आपण सहजच शोधू लागतो. एखाद्या वेळी समाधानकारक कारण सापडतेही. पण ते सापडेपर्यंत प्रश्न विचारण्यासाठी एक विषयसूत्र प्राप्त होते.

# कोऱ्या करकरीत नोटा

ही कथा घडली त्या विशिष्ट दिवशी जवळजवळ तीन डझन किंवा जास्तच माणसे माझ्या कार्यालयात येऊन दाखल झाली होती. त्यांची व्यवस्था लावण्यात माझा आणि माझ्या सहकाऱ्याचा कितीतरी वेळ गेला. त्यामुळे त्यांच्या सामानाची झडती घ्यायला चांगली टळटळीत दुपार झाली. सामानात नेहमीच्याच, सर्वसामान्यपणे आढळणाऱ्या वस्तू होत्या. आपल्या पत्नीचे व मुलाचे छायाचित्र, फाऊंटनपेने, पेन्सिली, चाकू, क्वचित एखाद्याकडे घड्याळ. बहुतेकांकडे पैसे होते; पण एकदोघांकडे तेही नव्हते.

सामानाचे दोन ढिगारे मात्र वेगळे होते. आपल्या वेगळेपणामुळे माझे लक्ष वेधून घेत होते. त्यातील एका ढिगाऱ्यातील पैशाच्या पाकिटात वीस भारी किमतीच्या कोऱ्या करकरीत नोटा होत्या. आजच्या काळात त्यांची किमत पन्नास पौंड सहज झाली असती. टेबलाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या आणखी एका ढिगाऱ्यातील पैशाच्या पाकीटातसुद्धा तशाच भारी किमतीच्या पंधरा कोऱ्या करकरीत नोटा होत्या. हा प्रकार थोडा चमत्कारिकच होता. पण त्याहून चमत्कारिक अशी गोष्ट माझ्या ध्यानात आली ती ही की, दुसऱ्या पाकिटातील नोटांवर पहिल्या पाकिटातील नोटांच्या पुढचेच क्रमांक होते !

मला लागलेल्या शोधाची कल्पना मी माझ्या सहकाऱ्याला दिली आणि त्या पाकिटांच्या दोन मालकांना भेटण्याची इच्छा दर्शवली. त्यांना संशय येऊ नये म्हणून उलटतपासणीत एकाला चौथा क्रमांक दिला तर दुसऱ्याला नववा दिला. ज्या पहिल्या तीन माणसांची उलटतपासणी मी घेतली ते सारे निःसंशय प्रामाणिक देशभक्त होते. ते एकाच जिल्ह्यात राहत होते. एकमेकांना बरीच वर्षे ओळखत होते आणि त्यांच्या निवेदनांचा परस्परांशी ताळमेळ बसत होता. त्यांची रवानगी मी तत्परतेने ' प्रिन्सेस आयरिन ब्रिगेड 'च्या मध्यवर्ती कार्यालयात केली. ' प्रिन्सेस आयरिन ब्रिगेड ' ही मुक्त डच सैनिकांची बनलेली तुकडी होती.

आता ज्याच्या पाकिटात त्या कोऱ्या करकरीत वीस नोटा होत्या त्याची पाळी आली. शरीराने तो चांगला धिप्पाड होता. त्याचे वय तिशीच्या पलीकडचे असावे, आणि कपड्यावरून आणि एकंदर आविर्भावावरून तो शेतमजूर किंवा कामगार वाटत होता. तो विशेष चलाख दिसत नव्हता. परंतु प्रथमदर्शनी होणाऱ्या मतावर विसंबणे योग्य नव्हे, ही गोष्ट माझ्या व्यवसायाने मला कधीच शिकवली होती. तरीही त्याचे ते ओबडधोबड, फताडे हात पाहिले तेव्हा त्या हातांना पैसे मोजण्यापेक्षा कुदळ–फावडे धरण्याचीच सवय अधिक असावी, असे मला वाटले.

" नाव काय तुझं ?" मी विचारले. वास्तविक त्याच्या सामानाच्या पिशवीवर त्याचे नाव लिहिलेले होते.

" बाखवीस पिंलट हे माझं नाव, साहेब. " हॉलंडमधील शेतमजुराचे असे जोड-

नाव असणे हे चमत्कारिकच होते. परंतु त्या वेळी मात्र मी त्याबद्दल अधिक चिकित्सा केली नाही.

" तुझ्या गावाचे नाव काय ?"

" एमनेस, साहेब " एमनेस हे यत्रेख जिल्ह्यातील एक छोटेसे शहर होते.

" आणि कसलं काम करतोस तू ? "

" शेतावर मजुरी करतो साहेब. " एकूण माझा त्याच्या व्यवसायाबद्दलचा कयास खरा ठरला होता.

" वय किती तुझं ? "

" छत्तीस, साहेब. "

येणे प्रमाणे मी त्याला आमचे ठराविक प्रश्न विचारत गेलो. त्याचा धर्म कोणता, त्याचे शिक्षण कोणत्या शाळेत झाले, तो कोणत्या राजकीय पक्षाचा सभासद आहे, त्याच्या आईचे माहेरचे नाव काय, तिचे माहेर कोठे आहे, त्याला भाऊ-बहिणी किती आहेत, त्यांची नावे काय, त्याला काका किती आहेत त्यांची नावे काय, असे एकामागून एक प्रश्न विचारत गेलो. अशा साध्या प्रश्नांनी पलीकडच्या माणसाने धारण केलेला बनावट अवतार उघडकीला येण्याचा संभव असतो. बनावट माहिती तयार करण्याच्या बाबतीत जर्मन हेर-शिक्षकांचा लौकिक फार मोठा होता. हेरांना ते चांगलेच पढवून ठेवीत. तरीही त्यांच्या बनावट कहाणीत एखादा कच्चा दुवा राहिला असेल तर तो अशा प्रकारच्या प्रश्नांनी हाती लागण्याची शक्यता असे. असे खोटे नाव आणि त्या नावाबरोबरच खोटी जीवनकथा घेऊन आलेला एखादा हेर, त्याच्या आज्याचे नाव काय, इतक्या साध्या दिसणाऱ्या प्रश्नातदेखील अडकू शकतो.




तो जर प्रत्युत्पन्नमती असेल तर त्या वेळीदेखील एखादे कल्पित नाव त्या कल्पित आत्याला देऊन वेळ निभावून नेतो. परंतु पुढील एक - दोन दिवसांत इतर अनेक प्रश्न विचारून नंतर सहज पुन्हा आत्याच्या नावाबद्दल पृच्छा केली असता, दोन दिवसांपूर्वी तोंडाला येईल ते सांगितलेले नाव विसरल्यामुळे त्याची उसनवारी उघड होण्याचा संभव असतो. बऱ्याच वेळा मोठ्या आणि नाट्यपूर्ण प्रश्नांच्या ऐवजी अगदी साध्यासुध्या नेहमीच्या प्रश्नांमुळे निर्ढावलेले हेर गोत्यात आल्याची उदाहरणे आहेत.

बाखवीस - फ्लिटच्या एकंदर परिस्थितीची ओळख करून घेतल्यानंतर मी त्याला विचारले, " जर्मनांबदल आदर वाटतो का तुला ? "

तो रागावला आणि तिरस्काराने म्हणाला, " मला ? आणि जर्मनांबद्दल आदर ? मी तिरस्कार करतो त्यांचा ! अगदी त्यांच्यापैकी प्रत्येकाचा ! "

" हे तुझं म्हणणं खऱ्या देशभक्ताला साजेसंच आहे. " मी म्हटले, " आता बाखवीस - फ्लिट, मला हे सांग, आपला तिरस्कार परिणामकारक रीत्या कार्यान्वित करण्यासाठी काय योजना केलीस तू ? "

त्याचा गोंधळ उडाला. तो म्हणाला, " साहेब, आपण काय म्हणलात ते कळलं नाही मला. "

" बरं, मी प्रश्न वेगळया तऱ्हेनं विचारतो. भूमिगत चळवळीशी तुझा काही संबंध होता काय ? "

" असं होय ? आता आलं माझ्या ध्यानात साहेब, मी काही बढाई मारणारा माणूस नाही. पण जर्मनांविरुद्ध काहीतरी करावं असं जर मला वाटत नसतं तर, तुम्हीच सांगा, जीव धोक्यात घालून मी इथं मुद्दाम आलो असतो का ? "

" खरं आहे तुझं म्हणणं. पण मी विचारतोय इथं येण्यापूर्वी भूमिगत चळवळीला काही मदत वगैरे करीत होतास काय तू ? "

" होय तर. करीत होतो ना मदत. "

" कशी ? "

तो क्षणभर थांबला. मग म्हणाला, " कधी, कधी साहेब, मी रेल्वेलाईनच्या जवळ असलेल्या शेतावर कामाला जायचो. मग एक गाडी निघून गेली म्हणजे हळूच रेल्वेलाईनीत शिरून मी फिशप्लेट्स काढून टाकायचो. म्हणजे नंतर येणाऱ्या गाडीला अचूक अपघात व्हायचा बघा. "

" पण ती समजा, जर्मन सनिक वाहून नेणारी गाडी नसून प्रामाणिक डच लोकांनी भरलेली साधी उतारवाहू गाडी असली तर ? तर मग भलताच प्रकार व्हायचा. "

तो हसला. म्हणाला, " साहेब, एवढंसुद्धा आम्हांला कळत नव्हतं काय ? अहो, नतर येणाऱ्या त्या गाडीत पुष्कळ जर्मन सैनिक आहेत याची खात्री करून घ्यायचो

ना मी ! "

" ती कशी काय बुवा ? "

तो थांबून पुन्हा विचार करू लागला. " त्याची व्यवस्था केली होती मी " – त्याने सरतेशेवटी संदिग्ध उत्तर दिले.

" व्यवस्था ? कसली व्यवस्था ? "

पुन्हा एकदा उत्तर देण्यापूर्वी डोके खाजवून तो म्हणाला, " अहो, जवळच्या स्टेशनवरचा एक सिग्नलमन दोस्त होता ना माझा. तो द्यायचा आगाऊ सूचना मला. "

" तुझ्या कामाच्या ठिकाणाहून कितीसं लांब होतं हे स्टेशन ? "

" पाच किंवा सहा किलोमीटर लांब असेल, साहेब. "

" म्हणजे बरंच लांब म्हटलं पाहिजे. तरीसुद्धा तुला पूर्वसूचना मिळायची हे आश्चर्य आहे. तो सिग्नलमन आपली जागा तर सोडू शकत नव्हता ? "

" तुम्हांला तसंच म्हणायचं असेल तर तो जागा सोडू शकत नव्हता हे खरं आहे. "

" ' तसंच म्हणायचं असेल तर–' म्हणजे ! आणखी कसं म्हणायला पाहिजे होतं मी ! "

" ते नाही माहीत मला " बाखवीस–फ्लिट म्हणाला. आपली कहाणी बिन-बुडाची असल्याने ' साहेबां 'नी ओळखले आहे हे त्याच्या लक्षात आल्यावाचून राहिले नाही. आता तो बिचारा चांगलाच हबकून गेला होता.

अशी त्याची उलटतपासणी मी करत गेलो. मला जर्मनांची कीव आली. बाख-वीस–फ्लिटसारख्या मद्दड माणसालादेखील हेर करायला निघालेल्या जर्मन गुप्त-हेरखात्याला लायक माणसांचा मलताच तुटवडा भासत असला पाहिजे, अशी माझी खात्री झाली. बाखवीस–फ्लिटने सांगितलेल्या हकीकतीत इतक्या विसंगती आणि अतर्क्य गोष्टी होत्या की त्यांतील कोणत्याही एका गोष्टीवरून त्याला गुन्हेगार ठरवणं सहज शक्य होते. खिशात भरपूर नोटा बाळगणारा तो एकटाच असता तर त्याला मी त्याला तेथल्या तेथे अटक केली असती. परंतु बाखवीस–फ्लिटचा आमिषा-सारखा उपयोग करून त्याच्या मित्राला मी सापळ्यात अडकवू शकणार होतो. हा मित्र बाखवीस–फ्लिटपेक्षा अधिक धूर्त आणि कावेबाज असण्याची शक्यता गृहीत धरणे भागच होते.

त्यामुळे बाखवीस–फ्लिटची उलटतपासणी समाप्त करायचे मी ठरविले. टेबला-वरच्या नोटांकडे बोट दाखवत मी म्हटले, " या नोटा तुझ्या आहेत काय ? "

" होय साहेब. "

" एवढे पैसे कुठून आले तुझ्याकडे ? "

" माझ्या जिंदगीभरची बचत आहे ही साहेब ! "

" पण पैसे साठवायला लागून फार दिवस झाले नाहीत तुला असं दिसतं. "

" म्हणजे ! आपल्या बोलण्याचा अर्थ मी नाही समजलो. "

" कारण या नोटा तर अगदी नव्या कोऱ्या करकरीत दिसताहेत. "

त्याने थोडा विचार केला आणि म्हटले, " साहेब, मी फार काळजीपूर्वक जपून ठेवल्या होत्या त्या इतके दिवस. "

मी त्याच्या कहाणीकडे फारसे लक्ष दिले नव्हते. द्यायची गरजच नव्हती मुळी. त्याची कथा इतकी अविश्वसनीय होती की ती खरी तर नसेल ना, असा विचार एका वेळी माझ्या मनात येऊन गेला. मला वाटले, ज्यांनी बाखवीस–फ्लिटवर हेरगिरीची जबाबदारी सोपवली त्या जर्मन हेरखात्याने त्याहून अधिक व्यवस्थित कहाणी पढवली नसेल काय ! शेवटी मी त्याला विचारले, " तुझ्याबरोबरच आज इथं तीस-चाळीस माणसं आली आहेत. त्यांच्यापैकी कोणाला ओळखतोस का तू ?"

" नाही साहेब. " त्याने तत्परतेने उत्तर दिले.

" तुझी खात्री आहे अगदी ?"

" अगदी पक्की खात्री आहे, साहेब. त्यांच्यांतल्या एकालाही मी कधी पाहिले-सुद्धा नाही. "

मी मान हलवली. नंतर बाखवीस–फ्लिटची रवानगी मी माझ्या शेजारच्या खोलीमध्ये केली. माझ्या मनात एक योजना आकार घेत होती. त्याशिवाय त्या बाखवीस–फ्लिटला त्याच्या मूर्खपणावर विचार करायला असे मोकळे एक-दोन तास मिळणे इष्टच होते. ◻

**(उत्तरार्ध पुढील अंकी)**

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

## एप्रिल महिन्याचे राशिभविष्य

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

**मेष :** जाज्वल्य निष्ठा आणि दुर्दम्य आशावाद यांच्या जोरावर आपण आपल्या अनिष्ट परिस्थितीवर विजय मिळविला. प्रयत्नवादी माणसांना साडेसाती बाधू शकत नाही याचे ढळढळीत प्रत्यंतर आपण जगाला आणून दिलेत.

एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात आपण आपल्या अंगीकृत कार्यात चांगलेच यश मिळवून दाखवाल, नवे क्षेत्र हस्तगत कराल. यांत्रिक–विद्युत क्षेत्रांत अपेक्षेबाहेर यश मिळवू शकाल.

या कालात प्रकृतीची मात्र वरचेवर काळजी घ्यावी लागेल. वरिष्ठांशी नम्रतेने वागावे लागेल. दूरच्या प्रवासाचे टाळावे लागेल.

दि. ८ ते १४, २० ते २४, २८ ते ३० अपेक्षेबाहेर यश मिळवू शकाल.

**वृषभ :** शनी बारावा आणि मंगळ सातवा या दोन्हीही उग्र ग्रहांनी तुम्हांला पेचात धरलेले दिसत आहे.

संघर्ष पदोपदी जाणवायला लागेल. कोणतीही गोष्ट झटपट आणि अपेक्षेप्रमाणे घडू शकत नाही, असा प्रत्यय पावलोपावली यायला लागेल.

गुरू अनुकूल आहे ही एकच एक समाधानाची गोष्ट. तो तुमच्या प्रतिमेला धक्का लागू देणार नाही; पेचप्रसंग वाढवू देणार नाही.

भागीदारीचा व्यवहार चिघळण्याचा संभव फार. नोकरीधंद्याचे वातावरण सर्वसामान्य राहील. दूरच्या प्रवासाचे शक्य तो टाळा.

दि. ३ ते ८, १२ ते १६, १७ ते २७ विशेष अनुकूल काल.

**मिथुन :** बुध–शुक्र युती दशमांत, एवढा एक योगही तुमच्या आजवरच्या साऱ्या व्यथा–विवंचना मिटवून टाकील आणि सर्वत्र प्रसन्न वातावरण निर्माण करील. चौथ्या गुरूबद्दल खंत बाळगण्याचा प्रसंग येणार नाही.

दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य एकादशात येताच आपल्या अनेक आशा–आकांक्षा सफल होतील. उद्योगधंद्यात प्रगतीची लक्षणे दिसू लागतील. कला–साहित्याच्या प्रांतांत तर तुमचे श्रेष्ठत्व निरपवादपणे सिद्ध होईल.

स्थावराचा प्रश्न सुटेल, नव्या कल्पना कृतीत उतरतील. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. सहकारी पद्धतीचा अंगीकार करून नव्या व्यवसायधंद्याला चालना द्याल.

दि. ४ ते ८, १२ ते १६, २२ ते २७ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क** : भाग्यस्थानातील सूर्य–बुध–शुक्र तुम्हांला हवे ते द्यायला उद्युक्त आहेत. ते तुमचा व्यवसायधंद्याचा प्रश्न सोडवतील, स्थावराची विवंचना मिटवतील, वाहनाची काळजीही दूर करतील. दि. ८ च्या बुध-शुक्र युतीपासूनच सारे कालचक्र अनुकूल फिरू लागल्यासारखे दिसायला लागेल.

बदली–बढतीचे योग दिसू लागतील, व्यवसायधंद्याला नवे क्षेत्र लाभेल. वैद्यकीय रासायनिक क्षेत्रात तर उत्क्रांती घडेल.

तुमचा अनिष्ट काल इतिहासजमा झाला, असे समजायला हरकत नाही.

दि. ७ ते १०, १४ ते १९, २३ ते २६ आपल्या बऱ्याचशा अपेक्षा या काली सफल होतील.

**सिंह** : अष्टमातील रवि–बुधादी ग्रह भाग्यस्थानाकडे वाटचाल करू लागलेले आहेत ते दुसऱ्या पंधरवड्यात आपणांस सतत सहकार्य करतील. अपयशातूनही यश शोधण्याच्या तुमच्या प्रयत्नाला याच महिन्यात यश लाभेल.

दुसरा पंधरवडा व्यवसायधंदा, आरोग्य, सांपत्तिक स्थिती या सर्व बाबतींत अपेक्षेबाहेर यशाचा जाणवेल – सध्याची चौथ्या मंगळाची डोकेदुखी आता काहीशी निवळेल अशी लक्षणे दिसू लागतील – रेंगाळलेली कामे भराभर हातावेगळी होऊ लागतील. मंगळ कार्याचा प्रश्नही सुटण्याची लक्षणे दिसायला लागतील.

दि. ३ ते ८, १३ ते २०, २६ ते ३० या काली अपेक्षित यश लाभावे.

**कन्या** : ग्रहांच्या सहकार्याबरोबरच प्रयत्नांचीही शिकस्त केलीत म्हणूनच आजचे दिवस आपणांस दिसत आहेत.

अर्कशाला निर्मित
गंधर्व हरीतकी
संवय न लागणारे
सौम्य विरेचक
आम्लोविन
आम्ल पित्तादी विकारावर
व प्रवासांत होणाऱ्या
वांतीवर प्रतिबंधक
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

गुरु-मंगळांचे साहाय्य अजूनही काही दिवस आपणांस लाभणार आहे. कोणत्याही गोष्टींत सहसा माघार घेण्याचा प्रसंग येणार नाही.

कलावंतांना – चित्रपटसृष्टीतील व्यक्तींना आगामी २–३ महिन्यांचा काल अपेक्षेबाहेर यशाचा जाणवेल. संपत्तीवरोबरच प्रतिष्ठाही अमाप लाभेल. सामाजिक क्षेत्रात विशेष स्थान मिळवू शकाल. व्यवसायक्षेत्रात दीर्घ मुदतीचे करारमदार होतील. जे काही कराल त्यात घवघवीत यश लाभेल.

दि. ३ ते ९, १६ ते २१, २४ ते २८ सर्व दृष्टींनी अनुकूल काल.

**तूळ :** गुरु-मंगळांचे सहकार्य मिळत नसतानाही आपण एकाकीपणाने झगडून मिळविलेले यश आपल्यातील निर्धाराचे दर्शन घडविते, काही दिवस आपणांस असेच झगडावे लागणार आहे.

फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका – आणि भागीदारांशी सहकाऱ्यांशी नेहमीच जुळते मिळते घेण्याची सवय ठेवा.

कला क्षेत्रात अपयश येणार नाही, पण अपेक्षित यशही पदरी पडू शकणार नाही. उद्योगाचे नवे तंत्र आत्मसात केलेत तर या अनिष्ट कालीही आपले व्यक्तिमत्त्व निष्कलंक राहू शकेल.

दि. ३ ते ८, १३ ते २० आणि २३ ते २७ विशेष अनुकूल दिवस.

**वृश्चिक :** आज सर्वत्र आघाडीवर दिसतील फक्त वृश्चिक राशीचीच माणसे. बुध–शुक्र पंचमात गुरू एकादशात एवढे भांडवल प्रगतीचे अनेक टप्पे ओलांडायला पुरेसे आहे.

नोकरीधंद्याचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटेल, कला-क्रीडा क्षेत्रांत विक्रम करून दाखवणे सहजशक्य होईल. यांत्रिक–विद्युत क्षेत्रांतही तुमचे स्थान उंचावणे अवघड नाही. या महिन्यातील बुध–शुक्र युतीपासूनच (दि. ८) माझ्या म्हणण्याचा आपणांस प्रत्यय यायला लागेल.

मंगळाच्या कटकटी मधून मधून जाणवल्या तरी त्यामुळे फारसे काही बिघडणार नाही.

दि. १ ते ८, १५ ते १९, २३ ते २६ या काली अपेक्षेबाहेर यश पदरी पडेल.

**धनू :** रवि–मंगळ हे दोन्हीही तुमच्यावर नाराज आहेत. त्यामुळे हाती घेतलेली कामे गतिशून्य बनू लागतील. अनवश्यक खर्चाला काही ताळतंत्रच राहणार नाही.

गुरु-हर्षल वेळप्रसंगी तुमच्या साहाय्याला धावून येतीलही, पण तेवढे सहकार्यही अपुरे पडू लागेल. वैचारिक संघर्ष वाढू लागतील, व्यवसायधंद्यात–राजकीय अडचणी पदोपदी यायला लागतील, व्यवसायधंद्यात साहस करण्याला हा काल मुळीच अनुकूल नाही. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी दहा वेळा तरी विचार करायला हवा. दूरचा प्रवास टाळा.

दि. ४ ते ८, १२ ते १६, २१ ते २७ विशेष अनुकल काल.

**मकर :** गुरु-मंगळाच्या जोडीला सूर्याचीही अनुकूलता आपणांस लाभत आहे. आपल्या जीवनात हा एक पर्वकाल लाभत आहे, या काळाचा आपण अधिकाधिक लाभ उठवलात तर आपली जीवनपातळी निश्चितच उंचावेल. याच काली अभिनव, आकर्षक असे काही करून दाखवाल आणि ह्यामुळे तुमचे सामाजिक स्थान उंचावेल.

नोकरीमध्ये उच्चाधिकार लाभेल. अनपेक्षित लाभ पदरी पडतील, उद्योगधंद्याचा व्याप आणि विस्तार खूपच वाढेल, थोरांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल.

दि. २ ते ८, १२ ते १९, २४ ते २९ या काळी अनेक प्रश्न सुटू शकतील.

**कुंभ :** एकटया आठव्या गुरूने फारसे काही बिघडणार नाही. मंगळ-शुक्रांचे कधी नव्हते एवढ सहकार्य आपणांस मिळत असल्यामुळे तुमच्या सांसारिक व व्यावसायिक जीवनातील अनेक समस्या भराभर सुटायला लागतील.

लवकरच दूरचा प्रवास घडेल, नोकरीधंद्यात क्रांती घडून येण्याची लक्षणे दिसायला लागतील. प्रगतीची नवी दालने दृष्टिक्षेपात यायला लागतील; साहित्य, नाटयकला क्षेत्रात अनन्यसाधारण यश सहजासहजी मिळू शकेल. व्यावहारिक जीवनात आश्चर्यकारक चांगल्या घटना नेहमीच घडून यायला लागतील.

दि. ४ ते १०, १५ ते २१, २७ ते ३० अपेक्षित यश मिळेल.

**मीन :** जवळ जवळ एप्रिल महिनाभर शुक्राचे तुमच्या राशीतच वास्तव्य असल्यामुळे कला–नाटय क्षेत्रांतील व्यक्तींना हा एक महान पर्वकाल लाभल्याची पदोपदी जाणीव व्हायला लागेल.

सांपत्तिक योग अनपेक्षितपणे सुधारतील, नोकरीत एकाएकी स्थलांतर घडेल, अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

व्यवहारधंद्यात नवे तंत्र अंमलात आणाल आणि ते अपेक्षेबाहेर यशस्वी ठरेल

साहित्याच्या व संशोधनाच्या क्षेत्रांत मुक्तसंचार सुरू होईल, सभासंमेलनात भाग घेतला जाईल, थोरांच्या कृपेमुळे घवघवीत यश मिळेल.

दि. ५ ते ११, १६ ते १९, २४ ते ३० अत्युत्तम क्रांतीचा काल.

○

MANOOS (Weekly) ı 40 Paise ı Regd. No. M H–649

लेखक वि. ग. कानिटकर

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

किंमत

पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी संगम प्रेस, प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५
[illegible] पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर